# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा.

(स्थापना तारीख २५।५।२१)

# घटना व नियम.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९२१.

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा

## कार्यकारी मंडळ.

१९२१-१९२२.

ध्यक्ष:—रावसाहेब शंकर भालचंद्र बापट B. A. पेनशनर ( डोलकर आळी, सदाशिव, पेठ पुणें ).

उपाध्यक्ष:—रा. रा. केशव रामचंद्र छापखाने M. A. LL. B. वकील(सांगली).

सेक्रेटरी:—१ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर B. A. LL. B. संपादक केसरी ( केसरी ऑफिस, पुणें).

२ रा. रा. अनंत विनायक पटवर्धन B. A. मेंबर सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ( किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें ).

सभासद—१ प्रो. के. रा. कानिटकर M. A., B. SC. (फर्ग्युसन कॉलेज, पुणें).

२ रा. ल. ब. भोपटकर M. A., LL. B. वकील(सदाशिव पेठ, पुणें)

३ ,, ल. ज. आपटे B. A. LL. B. वकील (सदाशिव पेठ, पुणें).

४ ,, ग. र. अभ्यंकर B. A., LL. B. वकील ( सांगली ).

५ ,, गो. म. रानडे, वकील ( मिरज ).

६ ,, वा. य. वाटवे B. A., LL. B. वकील ( जमखंडी ).

७ ,, बलभीम मल्लिकार्जुन पाटणे (खंडाळी, सं. मिरजमळा ).

८ ,, धोंडो अमृत शेटचे ( भोर ).

९ ,, त्रिंबक रामचंद्र चमचे ( फलटण ).

१० ,, विष्णु बाबा अक्कलकोटकर, सं. अक्कलकोट. ( ज्ञानकोश आफिस, शनवार पेठ, पुणें ).

११ ,, पं. आ. इनामदार M. A., B. SC. ( औंध ).

१२ ,, हणमंत कृष्ण बालगांवकर सावकार व वकील (जत ).

१३ ,, गं. आ. दिमोटे वकील ( जव्हार ).

१४ ,, गजानन भिकाजी वैद्य ( श्रीवर्धन, सं. जंजिरा ).

१५ डॉ. गोपाळराव पळसुले ( आनंदाश्रम, पुणें ).

१६ रा. वा. रा. कोठारी B. A. संपादक जागरूक ( पुणें ).

१७ ,, वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी B. A., LL. B. वकील सं. कोल्हापूर. ( कसबा पेठ पुणें. )

१८ ,, ग. शं. गोखले, संपादक विद्याविलास ( कोल्हापूर ).

१९ ,, म. चिं. जोग वकील ( इचलकरंजी ).

२० ,, मोरो बळवंत मराठे B. A., LL. B. वकील ( बेळगांव ).

रा. रा. अ. वि. पटवर्धन सेक्रेटरी यांनींच तूर्त खजिनदाराचेंही काम करणेचें आहे.

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा.

## घटना व नियम.

पुणें येथें दक्षिणी संस्थान प्रजा–परिषदेची खासगी बैठक ता. २४ व ता. २५ मे १९२१ रोजीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत रावसा. शंकर भालचंद्र बापट बी. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं झाल्या वेळीं दक्षिणी संस्थानांचें हितसंवर्धन व्हावें या हेतूनें वर्षभर सारखें काम करण्यास साधनीभूत होणारी संस्था स्थापन करण्याचें ठरून तिची घटना व नियम निश्चित करण्यांत आलें ते खालीलप्रमाणें आहेतः—

१ नांव. या संस्थेचें नांव दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा असें असावें.

२ ध्येय. दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या संस्थेचें ध्येय आहे.

[ The object of this Conference is the attainment of Responsible Government in Indian States in the Deccan, under the auspices of their respective rulers, by all legitimate and peaceful means ].

३ सभेच्या कार्याचें क्षेत्र. या सभेच्या कार्याचा विस्तार खालील संस्थानांच्या विस्तारा-हुकूम असावा.

१ जव्हार, २ जंजिरा (जाफ्राबाद तालुक्यासह), ३ सुरगणा, ४ डांग संस्थानें, ५ सावंतवाडी, ६ सावनूर, ७ कोल्हापूर, ८ कोल्हापूर जहागिरी संस्थानें, ९ औंध, १० भोर, ११ फलटण, १२ अक्कलकोट, १३ जत, १४ सांगली, १५ मिरज, १६ मिरजमळा, १७ मुधोळ, १८ जमखंडी, १९ रामदुर्ग, २० कुरुंदवाड, ( मोठी व लहान पाती. )

४ या सभेचे उद्देश व नियम मान्य असणाऱ्या कोणत्याही

कोणास सभासद होतां येईल ? स्त्रीपुरुषास या सभेचे सभासद होतां येईल.

५ या सभेचे उद्देश मान्य असल्याबद्दल प्रत्येक सभासदानें लेखी

सभासद होण्याच्या अटी. मान्यता दिली पाहिजे; सदर सभासद वयानें १८ वर्षांहून कमी नसावा; सभासदानें सभेची ठरलेली वर्गणी सभेचें वर्ष सुरू झाल्यापासून चार महिन्यांचे आंत दिली पाहिजे; सदर सभासदाची वर्गणी, ती भरणेबद्दल ठरलेले मुदतीचे आंत न आल्यास, त्याचें नांव सभेच्या सभासदांच्या पटावर ठेवणें अगर न ठेवणें याबद्दलची तजवीज करण्याचा अधिकार या सभेचा कारभार करण्याकरितां नियम ९ प्रमाणें नेमण्यांत येणाऱ्या कार्यकारी मंडळाकडे आहे.

६ या सभेच्या सभासदांचे आश्रयदाते, तहाहयात सभासद व

सभासदांचे प्रकार व अधिकार. सभासद असे तीन वर्ग केले आहेत.

एकदम १०० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **आश्रयदाते** म्हणावें;

एकदम ५० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **तहाहयात सभासद** म्हणावें;

साल दरसाल तीन रुपये सभेस वर्गणी देणारे गृहस्थास सभेचे **सभासद** म्हणावें;

या तिन्ही प्रकारच्या सभासदांच्या अधिकारांत मात्र कोणत्याही प्रकारचा भेदभाव असणेचा नाहीं.

७ या सभेच्या वर्षाचा आरंभ ता. ५ जूनपासून धरणेचा

वर्षारंभ. आहे.

८ या सभेचें केंद्रस्थान पुणें शहर हें असावें व या सभेची कचेरी

केंद्रस्थान. पुणें येथें असावी.

९ या सभेच्या कामाची व्यवस्था करण्याकरितां एक अध्यक्ष, एक

कार्यकारी मंडळ. उपाध्यक्ष, दोन चिटणीस, एक खजीनदार व वीस साधारण सभासद अशा २५ गृहस्थांचें कार्यकारी मंडळ असावें.

१० या सभेच्या सभासदांची वार्षिक सभा साल दरसाल मे अथवा जन महिन्यांत कार्यकारी मंडळान सोईच्या दिवशीं भरवावी. या सभेपुढें कार्यकारी मंडळानें वर्षाच्या कामाचा अहवाल व हिशोबाचा तक्ता मांडावा व ते मंजूर करून घ्यावेत. वार्षिक सभेंत पुढील सालाकरतां नवीन कार्यकारी मंडळाची नेमणूक करावी. या वार्षिक सभेपुढें कार्यकारी मंडळास अथवा कोणा समासदास जे जे प्रश्न वाटाघाटीस मांडावे असे वाटतील ते मांडण्यांत येऊन त्यांची चर्चा व्हावी.

वार्षिक साधारण सभा.

११ कार्यकारी मंडळाची सभा पुणें येथें दर २ महिन्यांनीं सोई-प्रमाणें सेक्रेटरी यांनीं भरवावी. कार्यकारी मंडळाची सभा न भरवितां कामाचा निकाल सरक्युलरनें लावून घेणें सेक्रेटरीस सोईचें वाटल्यास तसें सेक्रेटरींनें करावें.

कार्यकारी मंडळाच्या सभा.

१२ सभेच्या सभासदांपैकीं २० सभासदांच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या ५ सभासदांच्या सह्यांनिशीं विशेष कामा-करितां सभेच्या सर्व सभासदांची विशेष साधारण सभा अथवा कार्यकारी मंडळाची सभा बोलवावी अशी सूचना आल्यास कार्यकारी मंडळाची सभा १० दिवसांत व सभेच्या समासदांची विशेष साधारण सभा एक महिन्याचे आंत सेक्रेटरींनीं भरवावी.

विशेष साधारण सभा.

१३ सभेच्या साधारण सभेचें कोरम २० असावें व कार्यकारी मंड-ळाच्या सभेचें कोरम ५ असावें.

कोरम.

१४ या सभेच्या कार्याकरितां सभासद नाहींत अशांच्याकडूनही देणगीच्या रूपाची मदत घेण्यास हरकत नाहीं.

देणग्या.

१५ सभेच्या शाखा संस्थानांतुन स्थापण्याचा अथवा संस्थानांतून आज असलेल्या व पुढें आस्तित्वांत येणाऱ्या संस्था, सभेचें ध्येय, नियम व नियमन मान्य करीत असून, सभेस जोडून घेण्याबद्दल त्यांचें मागणें आल्यास, त्या तात्पुरत्या सभेस जोडून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंड-ळास असावा व सदर कार्यकारी मंडळाचा ठराव सभेच्या साधारण सभेपुढें मांडून तो पास करून घ्यावा.

शाखा स्थापणें व संस्था स्थापणें.

१६ सभेच्या शाखा अथवा सभेस जोडून घेतलेल्या संस्था यांचें काम कार्यकारी मंडळास मान्य नसल्यास त्या शाखा अथवा संस्था यांचा सभेशीं असलेला संबंध मंडळानें तात्पुरता तोडून टाकण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास असावा व याचा अखेरचा निर्णय करण्याचा अधिकार सभेच्या साधारण सभेकडे असावा.

शाखा व संस्था यांचा संबंध तोडणे.

१७ सभेच्या सभासदांपैकीं कोणा सभासदास, सभासदांच्या पटांतून कमी करणें, सभेच्या हितानहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे असें कार्यकारी मंडळास वाटल्यास, कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं $\frac{2}{3}$ मतांनीं त्याचें नांव पटांतून कमी करणेचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

सभासद कमी करणें.

१८ या सभेच्या घटनेसंबंधानें जे नियम पास करण्यांत आले आहेत त्यांत पुढील परिषदेची बैठक होईपर्यंत कमजास्त करणें अवश्य होईल तर, कार्यकारी मंडळाच्या $\frac{3}{4}$ सभासदांच्या मतानें सदर फेरफार मंजूर करून ते तात्पुरते अमलांत आणण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

नियमांत कमजास्त करण्यास अधिकार.

# दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभा.

## * सभासद होऊं इच्छिणाऱ्या इसमानें भरण्याचें

# मान्यतापत्रक.

रा. रा. अध्यक्षसाहेब, दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभा यांसीः—

वि. वि. मी खालीं सही/निशाणी करणार दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभेचा सभासद होऊं इच्छितों. मीं सभेचे नियम समजावून घेतले आहेत. सभेचे उद्देश, ध्येय, नियम व नियमन मला मान्य आहेत व त्याप्रमाणें मीं वागण्यास तयार आहें. माझेसंबंधाची माहिती याखालीं लिहिली आहे ती बरोबर आहे.

तारीख सही/निशाणी ______________________________

१ संपूर्ण नांव ______________________________

२ संपूर्ण पत्ता ______________________________

३ मूळ ठिकाण ______________________________

४ संस्थानांतील अथवा खालसांतील ______________________________

५ वय ______________________________

६ जात व धर्म ______________________________

७ धंदा ______________________________

८ पदवी किंवा हुद्दा ______________________________

९ शिक्षण योग्यता ______________________________

१० सभासदांपैकीं प्रकार ______________________________

* टीपः—सभासदानें विशेष लक्ष्यांत ठेवणेचे नियम १।२।३।४।५।६।१७.



श्री.

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा-कचेरी.

किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें शहर.

ता. १ जुलै १९२१.

वि. वि. गेल्या मे महिन्यांत पुणें येथें दक्षिणेंतील संस्थानांतील प्रमुख गृहस्थ व खालसांतील संस्थानी प्रश्नांबद्दल आस्था वाटणारे मित्र यांची एक खासगी परिषद् भरविण्याचें ठरून ती त्याप्रमाणें तारीख २४।२५ मे १९२१ रोजीं भरली होती. तिची हकीगत पत्रद्वारें व वर्तमानपत्रद्वारें आपल्यास यापूर्वी कळलेलीच असेल. परिषदेच्या बैठकीस आपल्यास यंदा अन्य व्यवसायांमुळे हजर रहातां आलें नाहीं तथापि आपली सहानभूति सदर कार्यास आहेच.

सदर परिषदेचें कार्य सतत चालावें म्हणून तिचे बैठकीचे वेळीं **दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा** नांवाची संस्था स्थापन झाली असून तिच्या सभासदांचे, **आश्रयदाते** ( १०० रुपये देणारे ), **तहाहयात सभासद** ( ५० रुपये देणारे ) व **सभासद** ( साल दरसाल ३ रुपये देणारे ) असे तीन वर्ग केले आहेत. आपण परिषदेस हजर असतां तर आपण तेथेंच आपले नांव सभासदांचे यादींत नोंदविलें असतें. संस्थेचें काम कार्यक्षम होण्यास तिच्या सभादांची संख्या मोठी असणें व तिच्या गांठी भरपूर पैसा असणें अवश्य आहे, हें आपल्यास माहितच आहे.

यालगत पाठविलेल्या परिषदेच्या त्रोटक अहवालावरून परिषदेची बैठक किती यशस्वी झाली याची आपल्यास थोडीशी कल्पना येणार आहे. या परिषदेच्या बैठकीच्या वेळीं स्थापन झालेल्या **द. सं. हि. व. सभेची** घटना व नियम व सभासदानें भरण्याचा नमुना हीं यालगत आहेत. तरी सभासद-नोंदीचा नमुना भरून लगतचे पाकिटांतून जरूर पाठविणेची मेहेरबानगी व्हावी व आपली वर्गणीही ताबडतोब पाठवावी. आपल्या परिचितांपैकीं सदर सभेचे सभासद होण्यासारखे असतील त्यांच्याकडून नोंदनमुना भरवून पाठविणेची तसदी घ्यावी, अशी विनंति आहे. जरूर असेल तर जास्त नमुन्यांची मागणी करावी क. लो. अ. हे वि.

**नरसिंह चिंतामण केळकर.**
**अनंत विनायक पटवर्धन.**
सेक्रेटरी.

आ. भू. प्रेस, पुणें. ]

श्री.

दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा–कचेरी,

किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें शहर.

ता.

वि. वि. लगत गेल्या मे महिन्यांत पुणें येथें भरलेल्या **दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेच्या** खासगी बैठकीचा अहवाल व सदर परिषदेंत स्थापन झालेल्या **दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेची** घटना व नियम यांची प्रत पाठवीत आहों. संस्थानांतन, तेथील संस्थानिकांच्या मार्फत, प्रजाप्रतिनिधितंत्री राजव्यवस्थेचें धोरण जाहिर होऊन तें अमलांत येण्यास सहकार्यानें प्रजेच्या तर्फे चळवळ व्हावयास पाहिजे. संस्थानिकांना प्रजेच्या इच्छा व्यवस्थित स्वरूपानें कळविण्यास व त्यांची तीव्रता त्यांच्यापुढें आणण्यास संघटित कार्य करण्याकरितां एखाद्या समाइकीनें काम करणाऱ्या संस्थेची अवश्यकता होती. ती उणीव द. सं. हितवर्धक सभेच्या संस्थापनेनें दूर झाली आहे. ती कार्यक्षम होण्यास पुष्कळांनीं तिचे सभासद होणें, तिच्या कार्यास लागणारे खर्चाच्या पैशाचा पुरवठा करणें व तिच्या व्यवस्थापकमंडळास स्थानिक गरजा व माहिती यांचा पुरवठा मिळविणें यांची जरूरी आहे. तर यांपैकीं सर्व, निदान कांहीं, मार्गांनीं सभेस मदत करण्याकरितां आम्ही या पत्रद्वारें विनंति करीत आहों. आपण खालील विनंतीस मान देणेची मेहेरबानगी करावी.

१ आपण सदर सभेचे सभासद स्वतः व्हावें व सभेची पहिल्या वर्षाची वर्गणी व सभासद होणेचा लगत पाठविलेला नमुना भरून पाठवावा.

२ आपण आपल्या स्नेह्यांस सभासद करून त्यांची वर्गणी व भरलेले नमुने पाठविणेची खटपट करावी.

३ आश्रयदाते, तहाहयात सभासद किंवा सभासद होण्यासारखे आपल्या तेथील अथवा् अन्य ठिकाणच्या गृहस्थांचीं नांवे आपल्यास माहित असतील तीं पत्त्यासह कळवावींत.

४ आपल्या संस्थानांतील अडचणी व त्या संबंधाची माहिती कोणाकडून मिळेल तें कळविण्याची मेहेरबानगी करावी.

५ आपल्या संस्थानासंबंधानें छापलेलीं माहितीचीं पुस्तकें, रिपोर्ट, बॅजेट वगैरे काय आहेत व तीं सभेस कशी मिळतील याची माहिती कळवावी.

सभासद मिळविणें व त्यांची वर्गणी वसूल होणें याकरितां पत्रव्यवहारांत जितका कमी पैसा व वेळ खर्च होईल तितकें इष्ट आहे. लगत सभासद होणेचा नमुना व तो परत पाठविणेकरितां पत्त्याचें पाकीट पाठविलीं आहेत. आपल्याकडून सविस्तर उत्तर येईल अशी आशा आहे. क. लो. अ. हे विनंति.

आपले नम्र सेवक
**नरसिंह चिंतामण केळकर.**
**अनंत विनायक पटवर्धन.**
सेक्रेटरी,
द. सं. हितवर्धक सभा.

आ. भू. प्रेस, पुणें. ]

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा.

## सभासद होऊं इच्छिणाऱ्या इसमानें भरण्याचें

# मान्यतापत्रक.

रा. रा. अध्यक्षसाहेब, दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभा यांसीः—

वि. वि. मी खालीं सही/निशाण करणार दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेचा सभासद होऊं इच्छितों. मीं सभेचे नियम समजावून घेतले आहेत. सभेचे उद्देश, ध्येय, नियम व नियमन मला मान्य आहेत व त्याप्रमाणें मी वागण्यास तयार आहें. माझेसंबंधाची माहिती याखालीं लिहिली आहे ती बरोबर आहे.

तारीख सही/निशाणी ______________________________

१ संपूर्ण नांव ______________________________

२ संपूर्ण पत्ता ______________________________

३ मूळ ठिकाण ______________________________

४ संस्थानांतील अथवा खालसांतील ______________________________

५ वय ______________________________

६ जात व धर्म ______________________________

७ धंदा ______________________________

८ पदवी किंवा हुद्दा ______________________________

९ शिक्षण योग्यता ______________________________

१० सभासदांपैकीं प्रकार ______________________________

# सभासदांच्या माहितीकरितां अवश्य असणारे कांहीं नियम.

१ नांवः—या संस्थेचें नांव दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा असें असावें.

२ ध्येयः—दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या संस्थेचें ध्येय आहे.

३ सभेच्या कार्याचें क्षेत्रः—या सभेच्या कार्याचा विस्तार खालील संस्थानांच्या विस्ताराबरहुकूम आहे.

१ जव्हार, २ जंजिरा (जाफ़ाबाद तालुक्यासह), ३ सुरगणा, ४ डांग संस्थानें, ५ सावंतवाडी, ६ सावनूर, ७ कोल्हापूर, ८ कोल्हापूर जहागिरी संस्थानें, ९ औंध, १० भोर, ११ फलटण, १२ अक्कलकोट, १३ जत, १४ सांगली, १५ मिरज, १६ मिरजमळा, १७ मुधोळ, १८ जमखंडी, १९ रामदुर्ग, २० कुरुंदवाड, ( मोठी व लहान पाती. )

४ कोणास सभासद होतां येईल ?:—या सभेचे उद्देश व नियम मान्य असणाऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषास या सभेचे सभासद होतां येईल.

५ सभासद होण्याच्या अटीः—या सभेचे उद्देश मान्य असल्याबद्दल प्रत्येक सभासदानें लेखी मान्यता दिली पाहिजे; सदर सभासद वयानें १८ वर्षांहून कमी नसावा; सभासदानें सभेची ठरलेली वर्गणी सभेचें वर्ष सुरू झाल्यापासून चार महिन्यांचे आंत दिली पाहिजे; सदर सभासदाची वर्गणी ती भरणेबद्दल ठरलेले मुदतीचे आंत न आल्यास त्याचें नांव सभेच्या सभासदांच्या पटावर ठेवणें न ठेवणें याबद्दलची तजवीज करण्याचा अधिकार या सभेचा कारभार करण्याकरतां नियम ९ प्रमाणें नेमण्यांत येणाऱ्या कार्यकारी मंडळाकडे आहे.

६ सभासदाचे प्रकार —या सभेच्या सभासदांचे आश्रयदाते, तहाहयात सभासद व सभासद असे तीन वर्ग केले आहेत. एकदम १०० रुपये देणारे गृहस्थास सभेचे आश्रयदाते म्हणावयाचें; एकदम ५० रुपये देणारे गृहस्थास सभेचे तहाहयात सभासद म्हणावयाचें; सालदरसाल तीन रुपये सभेस वर्गणी देणारे गृहस्थास सभेचे सभासद म्हणावयाचें. या तिन्ही प्रकारच्या सभासदांच्या अधिकारांत मात्र कोणत्याही प्रकारचा भेदभाव असणेचा नाहीं.

७ सभासदास कमी करणें:—सभेच्या सभासदांपैकीं कोणा सभासदास सभासदांच्या पटांतून कमी करणें, सभेच्या हितानहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे असें कार्यकारी मंडळास वाटल्यास, कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं $\frac{2}{3}$ मतांनीं त्याचें नांव पटांतून कमी करणेचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

आ. भ. प्रेस. पुणें. ]

दुसरी

# सोलापूर जिल्हा परिषद.

मु. बार्शी.

ता. १८ व १९ मार्च १९१९ रोजीं भरलेल्या परिषदेचा

# अहवाल.

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक
पटवर्धन यांनीं छापिला व मुक्काम बार्शी येथें
रा. गोविंद पंढरीनाथ सुलाखे यांनीं
प्रसिद्ध केला.

१९१९.

# दुसरी सोलापूर जिल्हा परिषद.

## अध्यक्षांचें स्वागत व मिरवणूक.

बार्शी येथें दुसरी सोलापूर जिल्हा परिषद ता. १८-१९ मार्च १९१९ रोजीं पुण्याचे सुप्रसिद्ध पुढारी प्रो. शिवराम महादेव परांजपे, एम. ए., यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्षांची स्वारी श्री. नरसिंह चिंतामण केळकर व इतर पुण्याच्या पाहुणे मंडळीसह ता. १७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां दाखल झाली. अध्यक्षांच्या स्वागतार्थ स्वागतमंडळाची सर्व प्रमुख मंडळी रेल्वे स्टेशनवर हजर होती. स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर अध्यक्ष व इतर पाहुणे मंडळीस स्वागतमंडळाचे अध्यक्ष रा. रामभाऊ साने यांनीं हारतुरे समर्पण केल्यावर सर्व शहरांतून अध्यक्षांची थाटाची मिरवणूक काढण्यांत आली. अध्यक्षांच्या शृंगारलेल्या गाडींत श्री. केळकर व साने बसले होते. मिरवणुकींत हजारों लोक सामील झाले असून एकंदर व्यवस्था स्वयंसेवकमंडळानें उत्तम ठेविली होती. मिरवणुकीचे रस्ते ध्वज, पताका, कमानी, तोरणें यांनीं शृंगारले असून किटसनच्या दिव्यांनीं अपूर्व शोभा आणली होती. मिरवणूक श्री. सुलाखे यांच्या गिरणीपर्यंत पोंचावयास दोन तास लागले. मिरवणूक समाप्त झाल्यावर अध्यक्ष व पाहुणे मंडळी गिरणी कांपौंडांतील हवाशीर बंगल्यांत आराम करावयास गेली.

### दिवस पहिला.

ता. १८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां जिल्हा सभेच्या कामास श्री. सुलाखे यांच्या गिरणींतील मंडपांत सुरवात झाली. परिषदेसाठीं हा मंडप मुद्दाम उभारला असून तो उत्कृष्ट रीतीनें शृंगारला होता. मंडपाचें क्षेत्रफळ अदमासें १२५×७५ चौरसफूट होतें. अग्रभागीं अध्यक्ष व बड्याबड्या पाहुणे मंडळीकरितां एक विस्तीर्ण उच्चासन उभारलें होतें. उच्चासनाच्या चोहों बाजूंस स्वागतमंडळाचे सभासद व जिल्ह्यांतील इतर प्रतिनिधिबांधवांची बसण्याची व्यवस्था केली असून प्रेक्षकांसाठीं मंडपाच्या प्रांतभागीं चढतीं आसनें मांडलीं होतीं. स्वागतमंडळ व प्रतिनिधी मिळून सुमारें संख्या ७०० होती व प्रेक्षक सुमारें १३०० होते. जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतून प्रतिनिधी आले होते. प्रतिनिधी व स्वागतमंडळींत २५० ब्राह्मण, १०४ मराठे, ६५ जैन गुजर, १९ लिंगायत, ३७ मारवाडी, ३ मुसलमान, १ पार्शी, २१ कोमटी, १८ कासार, १६ भाटे, ५ रजपूत, ३ सोनार वगैरे सर्व जातीचे

लोक होते. स्त्रियांसाठीं बसण्याची खास व्यवस्था केली असून मंडपांत एकंदर दोन हजारांवर समुदाय होता. मंडपाला छतें, झालरी व सुंदर राष्ट्रीय वचनें कोरलेल्या पाट्या ठिकठिकाणीं लावल्या असल्यामुळें मंडपाची शोभा विशेष खुलून दिसत होती. पांच वाजण्याचे सुमारास मंडप प्रेक्षक-प्रतिनिधींनीं फुलून गेला होता. मंडपांत स्त्रीसमुदायहि शेंदीडशें होता. सभेची वेळ होतांच स्वागतमंडळाचे अध्यक्ष श्री. रामभाऊ साने हे प्रो. शिवरामपंत परांजपे, रा. नरसोपंत केळकर यांसह वर्तमान मंडपद्वारीं दाखल झाले व स्वयंसेवकांनीं त्यांना खडी ताजीम दिली. वंदेमातरम्‌च्या जयघोषांत सर्व मंडळी आसनस्थ झाली. उच्चपीठावर प्रमुख मंडळी बसली होती. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर डॉ. दातीर यांच्या प्रमुखत्वाखालीं पद्यगायन झालें.

**स्वागतपर पद्यें.**

राग-पूर्वी-ताल-त्रिताल.

**आज उगवला, मंगल दिन हा !**
**लाभ आम्हां झाला ॥ ध्रु० ॥**
**राष्ट्राचें हित पूर्ण कराया.**
**इष्ट हेतुतें सिद्धीस न्याया,**
**झणीं जागृति हो लोकमताला ॥ ध्रु० ॥**

राग-खमाज, ताल-द्रुत तीन ताल.

**भारत हमारा देश है, हित उसका निश्चय चाहेंगे,**
**उसके हितके कारण हम कुछ न कुछ कर जाएंगे ॥**
**भारत हमारी मातृभूमी, उसका ऋण हम पर है बहुत**
**उसके मिटाने की लिये, हम कुछ न कूछ कर जाएंगे ॥ १ ॥**
**भारत के दुःखप्रद अवनतिपर क्यौं न हि अश्रु बहावेंगें,**
**उसके हटाने के लिये हम कुछ न कूछ कर जाएंगे ॥ २ ॥**
**धर्म विद्या और धनसे उन्नति भारत की होवें;**
**उस उन्नति के मार्गमे हम कुछ न कूछ कर जाएंगे ॥ ३ ॥**

पद्यगायन झाल्यावर स्वागतमंडळाचे अध्यक्ष रा. रा. मो. साने यांनीं आपलें भाषण वाचून दाखविलें.

बंधुभगिनींनो ! बार्शीकरांचेतर्फे मी आपणा सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. १९१७ च्या आक्टोबर महिन्यांत या जिल्ह्याची पहिली परिषद् पंढरपूर येथें भरली होती, त्या वेळीं या शहराच्या वतीनें रा. गोविंद पंढरीनाथ उर्फ

आण्णासाहेब सुलाखे व रा. दिगंबर एकनाथ उर्फ बाबासाहेब साखरे यांनीं दुसऱ्या परिषदेकरितां आमंत्रण दिलें होतें. आमंत्रण देणारांपैकीं रा. बाबासाहेब साखरे हे इन्फ्ल्यूएंझाचे सांथींत कैलासवासी झाले याबद्दल आम्हांस फार दुःख वाटत आहे, तथापि या दुःखानें खचून न जातां रा. आण्णासाहेब सुलाखे यांनीं कंबर बांधून या परिषदेचा योग घडवून आणला आहे. परिषदेसारख्या कामास लागणाऱ्या अनेक साधनांचा आमच्या शहरांत तुटवडा असल्यामुळें किती जरी प्रयत्न केले तरी आपला बंदोबस्त योग्य प्रकारें रहाणें कठीण पडेल. तथापि आमचेकडून जें अल्प प्रमाणानें आदरातिथ्य होईल तें आपण उदार मनानें गोड करून घ्याल अशी आशा आहे.

बार्शी शहराचा पूर्वेतिहास ऐतिहासिक दृष्ट्या फार मोठ्या महत्वाचा आहे असें कांहीं नाहीं. द्वादशीक्षेत्र या नांवानें या ठिकाणचा उल्लेख अंबरीषविजय या पोथीमध्यें आढळतो. श्रीमल्लिकार्जुन, श्रीभगवंत, एकविरा देवी, वगैरे देवस्थानांचा व कांहीं तीर्थांचा उल्लेख या पुराणांत केलेला आहे. पंढरपुरास जाणाऱ्या यात्रेकरूंपैकीं कांहीं यात्रा श्रीभगवंताचे दर्शनास येथें उतरते.

ऐतिहासिक काळाकडे पहातां देवगिरीचे यादव, चालुक्य व राष्ट्रकूट या हिंदुराजांची सत्ता चौदाशें शतकापर्यंत सोलापूर जिल्ह्याच्या बऱ्याच भागांत असावी असें दिसतें. सतराशें शतकांत हा प्रांत मोगलांकडे गेला, तेथपर्यंत विजापूर, अहमदनगर येथील मुसलमानी घराण्याकडे हा प्रांत असावा. मोगलाकडे हा प्रांत गेला त्या सुमारास मराठी सत्तेचा बराच उदय झाला होता. निजामच्या ताब्यांतील हैबतराव निंबाळकराकडे १७१५ सालीं बार्शी, माढें, करमाळा, परंडा वगैरे भाग होता. या तालुक्यांत कल्याण-स्वामीचे शिष्य जगन्नाथ स्वामी यांनीं ढोकी-तळवळे येथें रामदासी मठाची स्थापना केली. १७९५ ची खर्ड्यांची लढाई झाल्यावर हा भाग पेशव्यांकडे गेला असें दिसतें. सन १८१८ सालच्या अष्ट्याच्या लढाईनंतर हा प्रांत इंग्रजांकडे गेला व सुमारें १०० वर्षे तो इंग्रजांच्या ताब्यांत आहे.

सोलापूर जिल्ह्यांत बार्शी हा महत्वाचा तालुका आहे. या तालुक्यास चोहोंकडून निजाम सरकारची हद्द लागली आहे, व बेटाप्रमाणें हा तालुका तुटक आहे. बार्शीपासून १४ मैलांवर पूर्व अंगास बालेघाट लागतो. त्याची उंची बार्शीपासून सुमारें ५०० फूट आहे व समुद्राच्या सपाटीपासून सुमारें १७०० फूट आहे. बालेघाटाच्या सुरवातीच्या भागास वेडशीचा घाट असें म्हणतात व या वेडशी घाटांत रामलिंग या नांवाचें एक पवित्र देवस्थान आहे. बालेघाटामुळें बार्शीची हवा आरोग्यकारक आहे, व या तालुक्यांत पाऊसहि बरा पडतो. १८७० सालापर्यंत पावसाचें प्रमाण सुमारें ४४ इंच होतें परंतु तें कमी कमी

होब अलीकडे तें २५ पासून ३० इंचांपर्यंत आलेलें आहे. १८९६ च्या दुष्काळापासून हेंहि प्रमाण बरेंच कमी झालें आहे. तथापि जमीन बऱ्या प्रतीची असल्यामुळें योग्य वेळीं थोडा पाऊस पडला तरीं पिकें सहसा जात नाहींत.

गेल्या शतकाच्या प्रारंभीं बार्शीची वस्ती ३००० होती. स. १८५९।६० सालीं सोलापूरपर्यंत रेलवेचा फाटा गेला, त्यापूर्वीं लमाणांच्या बैलांवरून मालाची नेआण होत असे, व त्यावेळीं या तालुक्यांतील वैराग गांव व्यापारांत बराच पुढें असे. व वैरागावरून या तालुक्याचा लौकिक इतर ठिकाणीं झालेला असे. वैराग बार्शी अशा रीतीनें इकडच्या भागास परठिकाणचे लोक ओळखीत. वैराग येथें असणारीं भव्यमंदिरें व वाडे त्या काळच्या भरभराटीची साक्ष देण्यास अद्याप उभीं आहेत. १८५९—६० सालानंतर कुर्डुवाडी ज्याला पूर्वीं बार्शी रोड असें म्हणत असत तें स्टेशन झालें व तेथून बार्शीपर्यंत २२ मैलांची उत्तम सडक झाली व तेव्हांपासून बार्शी शहरचें व्यापारांत महत्त्व वाढू लागलें. निजाम हद्दींतून माल इंग्रजींत येणें, व इंग्रजांच्या हद्दींतील माल निजामचे हद्दींत जाणें, हा व्यापार बार्शीस फार मोठ्या प्रमाणानें सुरू होऊन बार्शी ही दक्षिणेंतील एक मोठी उतारपेठ असा तिचा लौकिक झाला. निजाम हद्दींत सुमारें दीडशें मैलांपर्यंत जो कापूस पिके त्याची आवक बार्शीस होऊं लागली, व सुमारें ४० मैलांपर्यंतचीं गळितांचीं धान्यें, हळद वगैरे माल बार्शीस येऊं लागला. तेलाचा व्यापारहि येथें बऱ्याच प्रमाणावर चालत असे. शिरशीची सुपारी व कोकानाडाकडील नारळ यांचीहि आवक येथें बरीच होती. पेण, पनवेलकडून येणारें मीठ व त्याचप्रमाणें अनेक प्रकारचा किराणा माल बार्शींतून निजाम हद्दीकडे जात असे.

अमेरिकन लढाईच्या पूर्वीं म्हणजे १८६१।६२ च्या पूर्वीं सुमारें पांच हजारांपासून तों दहा हजारांपर्यंत कापसाची गांठ या शहरांतून बाहेर जात असे. अमेरिकन लढाईच्या वेळीं सुमारें एक लाख गांठ बाहेर जाऊं लागली, व १८६५ सालानंतर म्हणजे अमेरिकन लढाई संपल्यानंतर सुमारें सत्तर ऐशीं हजार गांठ बाहेरगांवीं जात असे. निजाम हद्दींतील कंदार, करकली, लातूर, बीड, नांदेड वगैरे ठिकाणच्या व त्यांच्या आसपासच्या भागांचा कापूस बार्शीस येऊन तिची गांठ होऊन मुंबईकडे रवाना होत असे. येथील व्यापार मुंबई, पुणें, राजापूर, जुन्नर, रत्नागिरी वगैरे दूरदूरच्या भागांशीं होत असे. सहा लाखांपर्यंत गळिताचा धंदा चालत असे. १८७२ सालीं सुमारें एक लाखाची घडामोड येथील बाजारांत आठवड्यास होत असे असें वर्णन आढळतें.

१८७० सालीं वऱ्हाडांत खामगांवाकडे आगगाडी झाल्यापासून निजाम हद्दींतील कांहीं कापूस वऱ्हाडांत परभारें जाऊं लागला. १८७८ सालीं दौंड-मनमाड रेलवे झाल्यापासून येथील व्यापारास थोडी उतरती कळा लागली. सुमारें सात आठ वर्षांपासून म्हणजे निजाम सरकारचे हद्दींतील लातूरपर्यंत बार्शी

लाईट रेलवेचा फांटा गेल्यापासून व्यापारास बराच धक्का पोहोंचला आहे. तथापि अजूनहि आठ दहा हजारांपर्यंत रुई व कापसाच्या गाड्यांची आवक येथें होते व गळिताचीं धान्यें व इतर जिन्नस यांचाहि व्यापार बऱ्याच प्रमाणानें येथें चालतो. १९१२ सालापासून येथें कापडाची व सुताची गिरणी सुरू झाली आहे व महायुद्धामुळें तिची भरभराट आहे. या गिरणींत सुमारें २३० माग व ९००० चात्या चालतात, व १०, १४, २०, २२ या नंबरचें सूत निघतें. या गिरणींत निघणारें कापडहि चांगल्या प्रकारचें असतें. व निळ्या व काळ्या रंगाचें सूत तयार होऊन त्याचेंहि कापड निघतें. या गिरणींत काम करणाऱ्यांची संख्या सुमारें ७०० आहे. कापूसवठणीच्या गिरण्या येथें ७ आहेत व कापूस दाबण्याचे प्रेस पांच आहेत. येथें एक एनामेल्डचा कारखाना लवकरच सुरू होईल असा संभव आहे, व कमावलेलीं कातडीं तयार करण्याचा धंदा सुरू करण्याचा उपक्रम लवकरच होईल अशी आशा आहे.

पूर्वीं या शहरचा व्यापार लिंगाईत, कोमटी, रजपूत वगैरेच्या हातांत असे, परंतु रॅली व गाडमसारख्या युरोपियन व्यापाऱ्यांनीं व भाटे मारवाडी या परठिकाणच्या व्यापाऱ्यांनीं येथील स्थानिक व्यापाऱ्यांच्या हातांतील बाजार बराचसा काबीज केलेला आहे.

बार्शी शहरांत म्युनिसिपालिटी, दवाखाना, मराठी शाळा, मुलींची शाळा, संस्कृत शाळा, उडदूशाळा व इंग्रजी शाळा अशा संस्था बऱ्याच वर्षें चालू आहेत. मुळचंद जव्हारमल या नांवची धर्मादाय डिस्पेन्सरी कांहीं वर्षांपासून चालू झाली आहे व या डिस्पेन्सरीकरितां मूळचंद शेटजींनीं पन्नास हजार रुपये धर्मार्थ दिले आहेत. प्लेगच्या दिवसांत पोरक्या मुलांचें संरक्षण करण्याकरितां ऑर्फनेज काढण्याची कल्पना निघून नामदार श्रीधर बाळकृष्ण उपासनी यांच्या प्रयत्नांनीं व कै. शेट शिवाजी मुरारजी भाटे यांच्या दीर्घोद्योगानें लखमीदास खिमजी या नांवाचें ऑर्फनेज येथें चालू आहे. या शहरीं एक कोऑपरेटिव्ह युनिअन असून कोऑपरेटिव्ह पतपेढ्या तीन आहेत. तालुक्यांतही पतपेढ्यांचा प्रसार झालेला आहे. लिंगाईत मंडळींत शिक्षणफंड उभारलेला असून त्याचा उपयोग लिंगाईत विद्यार्थ्यांस होत आहे. येथें फार वर्षांची नेटिव्ह जनरल लायब्ररी आहे व व्यापारी मंडळींचें एक वाचनालय असून सुलाखे मोफत वाचनालय कांहीं दिवसांपूर्वीं सुरू झालेलें आहे. पुष्कळ वर्षांपासून येथें गोशाळा असून तिचा फंड बराच मोठा आहे. येथें एक रिक्रिएशन क्लब आहे व व्यापारी लोकांचा एक क्रिकेट क्लब आहे.

वर सांगितल्या प्रकारच्या अनेक संस्था या लहानशा शहरच्या मानानें येथें आहेत परंतु या शहरच्या व्यापारी लौकिकाच्या मानानें अर्वाचीन पद्धतीच्या शिक्षणाचा प्रसार या शहरीं कमी असल्यामुळें वरील संस्थांत जितकें चैतन्य दिसावें

तितकें दिसत नाहीं. १९०१ च्या खानेसुमारीप्रमाणें या शहरची लोकसंख्या सुमारें चोवीस हजार होती. १९०२ च्या प्लेगपासून लोकवस्तीची उतरती कळा लागली असून हल्लीं ती अठरा हजारांपासून वीस हजारांपर्यंत आहे. लोकसंख्येपैकीं सुमारें ८००० मराठे, ५००० लिंगायत व २००० मुसलमान अशी ढोकळ मानानें वस्ती आहे. या तीनही वर्गांत अर्वाचीन विद्येचा प्रसार ज्याप्रमाणानें वाढत जाईल त्याप्रमाणानें येथील सुधारणा अधिक होईल. लिंगाईत समाजांत याबद्दलची जाणीव उत्पन्न झाली आहे, व येथें एक हायस्कूल स्थापन करावें असेहि विचार चालू आहेत.

बार्शी शहरांत म्युनिसिपालिटीपुढें पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुष्कळ वर्षांपासून होता. पाण्याचें अवर्षण पडलें म्हणजे दीड दोन मैलांवरून पाणी आणावें लागे, व अशीं वर्षें १८९६ च्या दुष्काळानंतर बरींच गेलीं. हल्लीं बार्शी शहरास बार्शीपासून ११ मैलांवर असणाऱ्या पाथ्री तलावांतून नळानें पाणी येऊं लागलें आहे. या कामास लागणाऱ्या सुमारें पांच लाख रकमेपैकीं सुमारें निम्मी रक्कम सरकारानें मेहेरबानीनें मोफत दिली आहे. पाणीपुरवठ्याबरोबरच सांडपाण्याचा निकाल हाहि प्रश्न आरोग्यदृष्ट्या महत्वाचा असतो, व त्या प्रश्नाकडेहि कमिटीचें लक्ष असून त्यासंबंधींची योजना तयार होत आहे.

ज्या ठिकाणीं परिषद् भरावयाची त्या ठिकाणची स्थिति व पूर्वेतिहास सांगण्याची पद्धत आहे व त्या पद्धतीस अनुसरून वरील माहिती स्थूल मानानें मीं आपणांस दिली आहे. पंढरपूर येथें परिषदेस आमंत्रण देतांना कै. बाबासाहेब साखरे यांनीं अशी आशा प्रकट केली होती कीं, दुसरी जिल्हा परिषद् भरेपर्यंत स्वराज्याचे कांहीं तरी हक्क आपल्या पदरांत पडतील. परंतु त्या परिषदेनंतर जवळ जवळ सतरा महिन्यांनीं ही परिषद् भरत आहे, तरी अद्याप त्यांनीं प्रदर्शित केलेली आशा सफळ झाली नाहीं. स्वराज्ययोजनेचा विचार चालू आहे व वर्ष दीड वर्षांत त्या विचारास कांहीं तरी मूर्तस्वरूप येईल, अशी जरी आशा वाटत आहे तथापि, स्वराज्याच्या खडीसाखरेचा लहानसा खडा आमच्या तोंडांत जाण्यापूर्वी दडपशाही कायद्याच्या रूपानें व दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांच्या छळानें हिंदी लोकांच्या तोंडांवर चपराका मारण्याचा क्रम सुरू झाला आहे व यामुळें सर्व देशभर निराशेचे काळेकुट्ट ढग उद्भवूं लागले आहेत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. देशांत अराजकता नसावी, अत्याचारापासून प्रगति होणार नाहीं, व याकरितां अराजकता व अत्याचार यांचें उच्चाटन व्हावें हें सर्वांसच इष्ट आहे. परंतु या उच्चाटणाचे मार्ग सक्तीचे नसून प्रगतिपर राज्यकारभारांतील धोरणाचे असावे असें सर्व हिंदी जनतेचें म्हणणें आहे. राज्यकारभारांतील अनिष्ट धोरण अराजकता उत्पन्न होण्यास कारणीभूत असतें व तशा प्रकारचा अभिप्राय रौलेट कमिटीनें आपल्या रिपोर्टांत व्यक्त केला आहे. रौलेट कमिटीनें यासंबंधानें पुढील उद्गार काढले आहेतः

" But neither the religious teachings of Vivekananda, nor the exhortations of Shri Krisha in the Bhagwat Gita would have afforded so moving a text to preach from, had not the whole world and especially the Asiatic world, been electrified and amazed by the victories of Japan over Russia, *at a time, when within this country circumstances occasioned by certain Government measures specially favoured the development of Barindra's plans.* "

वरील उताऱ्यांतील शेवटचें वाक्य विशेष रीतीनें लक्षांत घेण्यासारखें आहे. अराजकता या रोगाचें निदान योग्य प्रकारें न करण्यांत अधिकाऱ्यांची मोठी चूक होत आहे.

सुधारणेची योजना अमलांत आल्यावर देशांत जी कांहीं थोडीबहुत आराजकता असेल ती नाहींशी होण्याचा संभव आहे. सुधारणांचा उपाय अमलांत आणण्यापूर्वीं सक्तीचे उपाय अमलांत आणणें हें गैरमुत्सद्दीपणाचें आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य यांस मर्यादित करणारे असे कित्येक जुने कायदे सरकारच्या दप्तरांत आहेत. सुधारणेची योजना अमलांत आणण्यापूर्वीं हे जुने कायदे रद्द झाले पाहिजेत, व हिंदुस्थानांतील लोकांस व्यक्तिस्वातंत्र्य व विचार-स्वातंत्र्य, स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांप्रमाणें मिळालें पाहिजे असे ठराव मुंबईस जादा राष्ट्रीय सभेंत व त्याच शहरीं भरलेल्या नेमस्तांच्या परिषदेंत पसार झालेले आहेत. परंतु या ठरावांकडे दुर्लक्ष करून हिंदी जनतेच्या गळ्याभोंवतीं असणारे फांस कमी न करतां जास्त घट्ट करण्याचा प्रयत्न होत आहे हें अत्यंत उद्वेगजनक आहे. महायुद्धासारख्या विशेष अडचणीच्या प्रसंगीं लोकांचें स्वातंत्र्य मर्यादित करणें हें एका अर्थानें क्षम्य असेल; परंतु महायुद्धांत आमच्या सरकारास यश आल्यावर लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा घालणें हें केव्हांहि न्याय्य मानलें जाणार नाहीं.

महायुद्धाच्या वेळीं हिंदुस्थाननें पैशाची व माणसांची मदत केली व हिंदी लोकांनीं जी राजनिष्ठा दाखविली त्याबद्दल आमचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत येत होतीं; परंतु लढाई संपल्याबरोबर आमच्या आफ्रिकेंतील देशबंधूंचा जो छळ सुरू झाला आहे व या देशांत दडपशाहीचे कायदे करण्याचा जो उपक्रम सुरू आहे त्यावरून आमचीं स्तुतिस्तोत्रें मानभावीपणानें गाण्यांत येत असावीं अशी हिंदी जनतेस शंका येणें हें अगदीं स्वाभाविक आहे. या देशांतील युरोपियन व्यापारी व युरोपियन नोकर हे सामान्यतः हिंदी लोकांच्या आकांक्षेच्या विरुद्ध आहेत. व त्यांनीं स्वराज्याचा हक्क आमच्या पदरांत न पडण्याकरितां जोरानें खटपट चालू केली आहे, व त्यांचे इंग्लंडांतील भाऊबंदहि आमच्या विरुद्ध सारखी ओरड करीत आहेत.

हिंदुस्थानांतील प्रजेचें स्वातंत्र्य हरण करून त्यांस जरी स्वराज्याचा कांहीं भाग दिला तरी तो फोल ठरणार आहे, अशा अर्थाचे उद्गार नामदार श्रीनिवास शास्त्री यांनीं कौन्सिलांत भाषण करतांना काढले आहेत. नामदार शास्त्री असें म्हणतात कीं:—

" All your talk of responsible Government will be real mockery, you may enlarge your councils, you may devise wide electorates, but the men that will then fill your councils will be toadies, timid men, and the bureaucracy, armed with these repressive powers will reign unchecked under the outward forms of a democratic Government."

स्वतंत्रतेकरितां व समतेकरितां जगांत चाललेल्या प्रचंड हालचालीपासून हिंदी जनतेस दूर ठेवावें अशा बुद्धींत दडपशाही कायद्यांचा उगम आहे अशी हिंदी जनतेची समजूत आहे व अशा स्थितींत स्वराज्याचे हक्क आपणांस किती अंशानें मिळतील, याविषयींही मन साशंक होतें. या माहिन्याच्या मॉडर्न रिव्ह्यू-च्या अंकांत सेंट निहालसिंग यांचा एक लेख आला आहे व त्यावरून मॅन्टेग्यू-चेल्मसफर्ड योजनेपेक्षांहि आपणांस कांहीं तरी कमी मिळेल असा त्यांचा तर्क आहे.

महायुद्धानें युरोपखंडांत पूर्वीचें मन्वंतर बदलत चाललें आहे. भांडवल व श्रम यांचा झगडा अत्यंत तीव्रतेनें तिकडे चालू आहे. भौतिक सुधारणेंत पाश्चात्यांनीं किती जरी सुधारणा केली, तथापि त्या सुधारणेचींच कटु फळें म्हणून तिकडच्या समाजांत अत्यंत विषमता उत्पन्न झाली आहे, व पाश्चात्य देशांना सामान्य जनतेचे हक्क व ह्या जनतेची दिनचर्या चांगल्या रीतीनें चालविण्याकरितां राज्यकारभाराची घडी नवीन वळणावर घालणें जरूर झालें आहे. सरकार म्हणून जी संस्था असते तीस प्रजेचें आनुकूल्य व सहकारिता असल्याशिवाय ती कधींहि टिकाऊ होत नाहीं. विवक्षित वर्गानें आपली तुंबडी भरावी व आपली सत्ता अनियंत्रितपणें चालवावी ही स्थिति समाजस्थैर्यास कधींहि पोषक असत नाहीं. तर उलट एकमेकांस मारक अशी होते. जॉनपिम यानें यासंबंधानें पुढील उद्गार काढले आहेत:—

" The best form of Government is that which doth actuate and dispose every part and member of a state to the common good; for, as those parts give strength and ornament to the whole, so they receive from it again strength and protection in their several stations and degrees. If, instead of concord and interchange of support, one part

seeks to uphold an old form of Government, and the other part a new, they will miserably consume one another. Histories are full of calamities of entire states and nations in such cases."

मनुष्यांचे नैसर्गिक हक्क व त्यांचें स्वातंत्र्य, त्यांचे मनोधर्म व त्यांच्या भावना यांकडे दुर्लक्ष करून कोणतीहि राजसत्ता वागूं लागेल तर अनिष्ट परिणाम भोगावे लागतील. या देशांतील नोकरशाहीनें राज्यकारभारांत शिस्त व चोखपणा आणला आहे, ही गोष्ट कोणीहि नाकबूल करीत नाहीं. नोकरशाही सामान्यतः आपलें कर्तव्य करण्यांत प्रामाणिक असते हेंहि आम्हांस कबूल आहे, परंतु राज्यव्यवस्थेंतील पद्धत एका प्रकारच्या सांच्यांत घालून तो सांचा ज्या यंत्राखालीं दडपला जात आहे त्या पद्धतींत बदल झाला पाहिजे, त्यावांचून राज्यव्यवस्था सुधारणार नाहीं. या जिल्ह्याचे पूर्वीं होऊन गेलेले कलेक्टर साहेब मि. माउंटफर्ड यांनीं एका जिल्हादरबाराच्या प्रसंगीं प्रजा म्हणजे निर्जीव यंत्र नव्हे तर मनोभावना व मनोधर्म असणारीं माणसें आहेत अशी समजूत त्यांच्यावर सत्ता चालविणाऱ्यांनीं नेहमीं ठेवावी असे उद्गार काढले होते. हिंदी जनतेवरून राज्यव्यवस्थेचा गाडा कशा रीतीनें हांकला जात आहे याबद्दल सर रवींद्रनाथ टागोर यांनीं आपल्या नॅशनॅलिझम नांवाच्या ग्रंथांत पुढील विचार प्रदर्शित केले आहेत:—

"But we who are governed are not a mere abstraction. We on our side, are individuals with living sensibilities. What comes to us in the shape of mere bloodless policy may pierce into the very core of our heart, may threaten the whole future of our people with a perpetual helplessness of emasculation, and yet may never touch the chord of humanity on the other side. In this reign of the nation, the governed are pursued by suspicions; and these are the suspicions of a tremendous mass of organized brain and muscle. Punishments are meted out, which have a trail of miseries across a large bleeding tract of the human heart; but these punishments are dealt by a mere abstract force in which the whole population of a distant country has lost its human personality. The benefit of the western civilization is doled out to us in a miserly measure by the nation which

tries to regulate the degree of nutrition as near the zero point of vitality as possible."

इंग्रजी राज्यानें देशांत शांतता झाली, आगगाड्या तारायंत्रें आलीं, व सुखाचीं व शांततेचीं साधनें वाढलीं, परंतु दिवसेंदिवस प्रजा निःसत्व होत चालली आहे अशी हिंदी लोकांची ओरड आहे, व येथील राज्यव्यवस्था लोकमतानें चालल्याशिवाय येथील प्रजेचें कल्याण होणार नाहीं अशी भावना आमच्यांत उत्पन्न झाली आहे. एका देशाच्या लोकांनीं दुसऱ्या देशाच्या लोकांवर अनियंत्रित सत्ता नेहमीं चालवावी ही स्थिति अस्वाभाविक आहे. या देशाचे लोक शहाणे करून त्यांचें राज्य त्यांचे हवालीं करूं असे उद्गार अनेक मुत्सद्यांनीं फार वर्षांपूर्वीं काढले आहेत. परंतु या उद्गारांप्रमाणें कृति करण्याची वेळ अद्याप आली नाहीं व हिंदी लोक स्वराज्याच्या हक्कास पात्र झाले नाहींत अशी ओरड आमचे प्रतिस्पर्धी करीत आहेत. इंग्लंडच्या लोकांत आमच्या स्थितीविषयीं गाढ अज्ञान आहे व येथें काम करणारे त्यांचे मुनीम इंग्रजांची इभ्रत व इज्जत स्वराज्य दिल्यानें नाहींशी होईल असा बागुलबोवा दाखवीत आहेत. या सर्व द्वैताचें मूळ अविश्वासांत आहे. संशयपिशाचानें येथील नोकरशाहीस बरेंच घेरलें आहे व अविश्वासानें अविश्वास वाढतो अशी शोचनीय स्थिति येत चालली आहे. आमच्याबद्दल ते अविश्वास दाखवितात व यामुळें त्यांचेविषयीं आमचे मनांत अविश्वास वाढतो असे आम्ही उभयतांहि अविश्वासाचे भोवऱ्यांत गरक्या मारीत आहोंत.

प्रभूच्या अचिंत्य करणीनें इंग्रजांचा व आमचा जो संबंध जडला आहे तो दोघांसहि हितपरिणामीं व्हावा अशी आमची इच्छा आहे. इंग्रजांच्या साम्राज्यछत्राखालीं आम्हीं दोघांनींहि सम भागीदार असावें व गुण्या गोविंदानें रहावें हेंच साम्राज्याच्या हिताचें आहे. इंग्रजी साम्राज्यांत हिंदी लोक भागीदार असावे असें थोर मनाचे कित्येक इंग्रज कबूल करितात. परंतु प्रत्यक्ष कृतीची वेळ आली म्हणजे ते कचरतात व "वचने किं दरिद्रता" या वाक्याची आम्हांस आठवण करून देतात. इंग्रजांतील थोर मुत्सद्यांनीं या वेळीं आपली दृष्टि मोठी करून व आपल्या देशबंधूंच्या कोल्हेकुईस न भिऊन धैर्यानें वागलें पाहिजे. येथील राज्यव्यवस्थेंत सुधारणा होण्यास राज्यकर्ते व प्रजाजन यांनीं कसें वागलें पाहिजे याबद्दल ए. रंगास्वामी आयंगार यांनीं "धी इंडियन कॉन्स्टिटयूशन" या लेखांत खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

"The true disposition to further the common good in its highest form, so necessary for future progress in India, can only be attained by the rulers of the land ceasing to take narrow views of mere administrative thoroughness

and by taking and imposing on the administration, broad views. What the people, on the other hand, need at this moment is sound organization and sage counsel and leadership. They want leaders who possess, in the words of Lord Morley ' The double gift of being at once practical and elevated, masters of tactics and organizing art and yet the inspirers of solid and lofty principles".

इंग्रजांचा व आमचा संबंध झाल्यापासून राष्ट्रीयत्वाची कल्पना आमच्यांत उत्पन्न झाली व आमच्या विचारांत एक प्रकारचें चैतन्य इंग्रजांच्या उदार शिक्षणानें खेळूं लागलें, याची कृतज्ञतापूर्वक जाणीव आह्मां सर्व सुशिक्षित लोकांस आहे. मेकाले, मेटकाफ, बेंटिंक, ब्राईट, फॉसेट, ब्रॅडलॉ, ह्यूम, वर्डस्वर्थ, वेडर्बर्न असे इंग्रजांतील जे थोर पुरुष होऊन गेले व ज्यांनीं आमच्या उन्नतीकरितां प्रयत्न केले त्यांचीं नांवें सुशिक्षितांच्या हृत्पटलावर प्रेमानें कोरलेलीं आहेत. संस्कृतींत, धर्मांत, जातींत भिन्न अशा या विस्तीर्ण देशांतील अफाट समुदायांत आपल्या विद्येनें चैतन्य उत्पन्न करूं व त्यांस आपल्या बरोबरीला आणूं असे पार्लमेंटांत उद्गार काढणारे मेकॉलेसारखे थोर महात्मे यांचे शब्द अद्यापपर्यंत आमच्या कानांत गुणगुणत आहेत. ज्या थोर विभूतींनीं विद्यारूप आंब्याची कोई हिंदुस्थानांत रुजूं घातली त्या कोईचा आतां मोठा वृक्ष बनला आहे व त्यास उत्तम फळें येऊं लागलीं आहेत हें पाहून ज्या अदूरदर्शी इंग्रजांस वाईट वाटतें त्यांचा बुद्धिभ्रंश झाला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जसें पेरावें तसें उगवतें हा निसर्गाचा न्याय आहे असें असून या आंब्याच्या कोईपासून करवंदें कां उत्पन्न झालीं नाहींत अशी ज्या इंग्रजांना हळहळ वाटत असेल त्यांच्या मेंदूबद्दल कोणासहि कींव वाटेल. इंग्रजांच्या साम्राज्याविषयीं हिंदुस्थानांतील कोणता वर्ग जर खरोखर राजनिष्ठ राहील तर तो सुशिक्षितांचाच राहील अशी खातरजमा एलफिन्स्टन कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल मि. वर्ड्स्वर्थ यांनीं पुष्कळ वर्षांपूर्वीं दिलेली आहे. महान् युद्धाच्या प्रसंगानें इंग्रजांची दृष्टि आमच्यासंबंधानें बरीचशी निवळली असावी असें वाटत होतें परंतु युद्ध बंद झाल्यापासून चाललेल्या प्रकारांवरून येथील इंग्रजांची तरी बुद्धि सामान्यतः आमच्याविषयीं जी गैरसमजाची होती ती तशीच दिसते. तथापि इंग्लंडांतील मुत्सद्यांचा दृष्टिकोण कांहीं अंशीं तरी बदलेल अशी आम्हांस आशा आहे. आपण असें म्हणतों कीं, भूमीवर कांहीं साधुपुरुष असतात, म्हणूनच भूमि चालते; त्याप्रमाणें कोणत्याहि देशाची उन्नति किंवा भरभराट होत असतां तेथें दैवी संपत्ति कांहीं तरी असलीच पाहिजे असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. केवळ पाशवी शक्तीवर राष्ट्राचा मोठेपणा कधींहि दीर्घकाळ टिकत नाहीं व याचें ताजें उदाहरण जर्मनीचें

आहे. इंग्लंडच्या वैभवांत इंग्लंडची नीतिमत्ता व दैवी संपत्ति यांचें साहचर्य आहे व म्हणूनच इंग्रजी साम्राज्याखालीं आमच्या उन्नतीची आशा आहे अशी आमची ठाम समजूत आहे. पाशवी शक्तीच्या पोटांत पाश्चात्य देशांत दैवी संपत्ति आहे असे सर रवींद्रनाथ टागोर यांनीं काढलेले उद्गार वाचण्यासारखे आहेत :

" The west could never have risen to the eminence she has reached if her strength were merely the strength of the brute or of the machine. The divine in her heart is suffering from the injuries inflicted by her hands upon the world and from this pain of higher nature flows the secret balm which will bring healing to those injuries. The east has instinctively felt, even through her aversion, she has a great deal to learn from Europe not merely about the materials of power, but about its inner source, which is of mind and of the moral nature of the man. Europe has been teaching us the higher obligations of public good above those of the family and the clan, and the sacredness of the law which makes society independent of individual caprice, secures for it continuity of progress and guarantees justice to all men of all positions in life. Above all these things, Europe has held high before our minds the banner of liberty, through centuries of martyrdom and achievement,--liberty of conscience,-- liberty of thought and action, liberty in the ideals of art and literature. "

पूर्व व पश्चिम यांच्या संयोगापासून एकमेकांचा फायदा झालेला आहे. व यापुढें एकमेकांविषयीं प्रेमळ स्वभाव वाढविल्यानें तो अधिक होणार आहे. १७५० सालापूर्वीं इंग्लंडांतील व्यापार किती कमी प्रमाणांत होता व प्लासीच्या लढाईनंतर हिंदुस्थानांतील द्रव्याचा झरा इंग्लंडांत वाहूं लागल्यापासून इंग्लंडाच्या व्यापार-उद्दीमाची कशी भरभराट झाली याचें वर्णन डिग्बी यांचे पुस्तकांत आपणांस वाचावयास मिळेल. हिंदुस्तानास स्वराज्य दिलें तर आमचें भांडवल कसें सुरक्षित राहील अशी जी ओरड येथील इंग्रज भांडवलवाले करीत आहेत त्यांना असें विचारण्यास हरकत नाहीं कीं, बाबांनो या तुमच्या भांडवलाचा उगम कोठून व कसा झाला याचा जरा निर्विकार मनानें विचार करा. इंग्रजांचें जेथें राज्य नाहीं अशा इतर देशांत इंग्रजी भांडवल जर सुरक्षित राहूं शकतें तर

आम्हांस स्वराज्याचे कांहीं हक्क दिल्यानें तें भांडवल वितळून जाईल असें म्हणणें निव्वळ तर्कटीपणाचें आहे. हिंदुस्थाननें केलेल्या उपकाराची फेड इंग्लंडनें केली पाहिजे असे सर जॉर्ज बर्डवूड यांचे यासंबंधानें उद्गार आहेत.

'India has done every thing for us, every thing that has made these islands, as insignificant on the face of the globe as the islands that make up Japan the greatest empire the world has ever known, and for this we owe undying gratitude to India."

न्याय, नीति व समता या थोर तत्वांच्या पायावर व स्वसमतीच्या तत्वावर राष्ट्रांची घटना होईल व हें तत्व युरोपांतच नव्हे तर आफ्रिकेंतील काळ्या व निग्रो लोकांसहि लावण्यांत येईल असे इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांनीं काढलेले उद्गार हिंदुस्थानसारख्या जुनाट व एका काळीं उच्चसंस्कृतीच्या राष्ट्रासंबंधानें खोटे ठरणार काय? मॉटेग्यू-चेल्म्सफर्ड सुधारणांनीं आमचें समाधान होणार नाहीं व हिंदुस्थान सरकारच्या राज्यकारभारांत लोकमताचा हात शिरकला पाहिजे व या देशास आर्थिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. अशी देशांतील सर्व सुशिक्षित लोकांची उत्कंठा आहे व स्वराज्याचे खरे हक्क आम्हांस मिळण्यास या गोष्टी घडून आल्या पाहिजेत हें इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं विसरून चालावयाचें नाहीं. सक्तींत शक्ति नाहीं पण प्रेमांत खरी शक्ति आहे हे स्वामी रामतीर्थांचे उद्गार इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

बंधुभगिनींनो! या वेळीं आपल्या देशस्थितीविषयीं आपण अंतर्मुख दृष्टि करून आपल्याशीं विचार करणें हेंहि फार अगत्याचें आहे. हिंदुस्थान हा ज्यांचा मायदेश आहे ते सर्व आपण एका दावणींत गोंवले गेलों आहों. या दावणींत असतांना आपण हिसकाहिसकी करणें म्हणजे आपल्या गळ्याभोंवतीं करकोचे पाडून घेण्यासारखें आत्मघातकीपणाचें होईल. आपण कोणत्याहि जातीचे किंवा पंथाचे जरी असलों किंवा मागसलेलें असलों, सुशिक्षित असलों किंवा अशिक्षित असलों, तथापि आपणा सर्वांची भवितव्यता इतकी निगडित झाली आहे कीं, आपण आपल्यांत एकी व सहकारिता या गुणांचा परिपोष अत्यंत उत्कट भावनेनें केला पाहिजे. राजकीय बाबतींत स्वातंत्र्य व समता यांची जी योग्यता आपण मानतों तशाच तऱ्हेची योग्यता सामाजिक व धार्मिक वगैरे बाबतींत मानली पाहिजे. स्वतंत्रता व समता हे शब्द आपण पुष्कळ वेळां उच्चारतों, पण त्यांतील मर्म आपले मनांत उत्तमपणें ठसल्याशिवाय या शब्दांच्या बडबडीपासून फारसा फायदा होणार नाहीं. विचारस्वातंत्र्याकरितां पाश्चात्य देशांतील अनेकांनीं धार्मिक बाबतींत आपलें प्राण खर्ची घातले आहेत. मनःस्वातंत्र्य ही अमोलिक चीज पाश्चात्यांनीं आपल्या कर्तबगारीनें मिळविली आहे. आपणास

-या कल्पना इंग्रजांपासून कांहीं अंशीं आयत्या मिळाल्यासारख्या झाल्या आहेत, व यामुळेंच धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय जुलमाबद्दल आपणांस जितकी चीड वाटावी तितकी वाटत नाहीं. वडिलार्जित द्रव्य मिळणें व स्वकष्टार्जित द्रव्य मिळविणें या दोहोंत जसें अंतर असतें तसें अंतर या कल्पनांबद्दल पाश्चात्यांत व आपल्यांत आहे. आयतें मिळविलेलें द्रव्य टाकून द्यावें असें कोणी म्हणत नाहीं, परंतु तें द्रव्य मिळविण्यास किती सायास पडले असतील याची जाणीव ठेवून आपल्यास मिळालेलें द्रव्य वृद्धिंगत करणें हें आपलें कर्तव्य आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक हीं राष्ट्रपुरुषाचीं निरनिराळीं आंगें आहेत. या सर्व आंगांची जोपासना न्याय, नीति व समता या तत्वांवरच आपण चालविली पाहिजे व असें केलें तरच राष्ट्रपुरुषाचें शरीर सतेज व धट्टेकट्टे दिसेल, सर्वांनाच सर्व गोष्टी करतां येणार नाहींत, परंतु प्रत्येकाला आपल्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें राष्ट्रपुरुषाची जोपासना करतां येईल.

" राष्ट्रीय प्रगतीच्या बाबतींत शुद्ध विचाराची वाढ हें एक अतिशय महत्वाचें साधन आहे. " " परिस्थित्यनुरूप बदला किंवा मरा हीच निसर्गाची गंभीर इषारत आहे " " हक्कांच्या संकुचित बुद्धीनेंच सर्व प्रकारचीं संकटें, चित्त-क्षोभ, हृद्रोग व आधिव्याधि उत्पन्न होत असतात " " निः–स्वार्थबुद्धीनें केलेल्या प्रत्येक कर्मानें परमेश्वर तुमचा ऋणी होतो " " मानवी इच्छेपुढें इतिहास कांपूं लागतो; मग ती इच्छा एकाच मनुष्याची कां असेना " वगैरे वचनें अत्यंत बोधप्रद असून तीं आपण नेहमीं मनन करण्यासारखीं आहेत. आपले प्रयत्नांत अनेक हरकती येतील, अनेक वेळां निराशा वाटण्याचे प्रसंग आले तरी खचून न जातां सतत प्रयत्न केले पाहिजेत. सुशिक्षितांस देशोन्नतीच्या कामांत परक्यांकडून व आपल्या देशबंधूंच्या अज्ञानापासून असा दोहींकडून विरोध येण्याचा संभव आहे. पण काम करणारांनीं मनाची समता ठेवून शुद्ध अंतःकरणानें राष्ट्रकार्य केलें पाहिजे. हिंदुस्थानची खालावलेली स्थिति पाहून त्याच्या उद्धाराकरितां प्रयत्न न करणें व देवा, आम्हांला अशा भूमींत कां उत्पन्न केलेंस असें म्हणून हळहळत बसणें म्हणजे आपण कोणत्याही भूमींत उत्पन्न होण्यास पात्र नाहीं असें सिद्ध करण्यासारखें आहे. इमर्सननें एकदां थोरोला विचारलें कीं, " सर्वांत देश चांगला कोणता ? " त्यावर थोरो म्हणाला, " तुझ्या पायां-खालची जमीन तुला स्वर्गाप्रमाणें किंवा वैकुंठाप्रमाणें वाटत नसेल तर या भूमी-वर रहाण्यास तूं योग्यच नाहींस. "

निरनिराळ्या विषयांबद्दल मतभेद होणें हें जिवंतपणाचें लक्षण आहे. परंतु प्रामाणिक मतभेद या गोड नांवाखालीं अहंकार, लोभ, द्वेष, मत्सर, पक्षपात वगैरे दुर्गुणांची वाढ न होईल अशी खबरदारी ठेविली पाहिजे. आपणां सर्वांना एका दिशेकडे जावयाचें आहे. मार्ग जरी भिन्न भिन्न असले तरी कांहीं हरकत नाहीं.

परंतु एकानें दुसऱ्याच्या मार्गांत कांटे पसरून त्याचा मार्ग कुंठित करणें हें महत्पाप मात्र कोणींहि करूं नये.

माझ्या तरुण मित्रांनो, राजकीय कामांत तुम्हांत जो उत्साह दिसतो तो अभिनंदनीय आहे. राष्ट्रोन्नतीच्या निरनिराळ्या चळवळींत राजकीय चळवळ ही शरीरांत जसें डोकें मुख्य त्याप्रमाणें प्रमुख आहे. परंतु इतर चळवळीहि राष्ट्रीय प्रगतीस जरूर आहेत. तुमचा उत्साह यशस्वी होण्यास कार्यक्षमता, शिस्त, सुसंगत घटना व शुद्ध विचार या गुणांची जोड त्या उत्साहास असली पाहिजे. या गुणांच्या अभावीं नुसत्या अतिरेकाच्या उत्साहांत कांहीं अर्थ नाहीं. मादक पदार्थांच्या सेवनाप्रमाणें अतिरेकाच्या उत्साहामुळें आंगांत वाटणारी ताकद ही खरी शक्ति नसून अंतीं शक्तिपात करणारी अशी राक्षसी आहे. देशोन्नतीचें क्षेत्र इतकें विस्तृत आहे कीं, हजारों तरुणांना तें पुरून उरण्यासारखें आहे. देशोन्नतीच्या अनेक मार्गांविषयीं सहानुभूति व प्रेम ठेवून कोणता तरी एक मार्ग—जो आपणांस झेपेल तो आक्रमण्याचा प्रयत्न आपण करणें यांत यशाची गुरुकिल्ली आहे. तुम्ही आपल्या कामाचा वरचेवर आढावा काढीत जाल तर आपण किती कमी काम करतों याची जाणीव तुमच्यांत उत्पन्न होऊन तो आढावा तुम्हांस अधिक काम करण्यास प्रवृत्त करील.

प्रत्यक्ष परिषदेच्या तयारीविषयीं सांगावयाचें तर प्रथमतः डॉ. दातीर यांच्या स्वयंसेवक चमूचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. या स्वयंसेवक चमूंत शेंभर सव्वाशें तरुणांचा समावेश झाला असून या चमूचा विशेष म्हणजे तींत सर्व जातींची व सर्व धर्मांची तरुण मंडळी मोठ्या उत्साहानें काम करीत आहेत. कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत पसरलेला सर्व देश हें माझें राष्ट्र व या देशांत वास करणारे सर्व लोक हे माझे देशबांधव ही राष्ट्रीय वृत्ति डोळ्यांपुढें ठेवून आपण वागलें पाहिजे. स्वयंसेवक मंडळी उत्साहानें या परिषदेचें काम करीत आहेत हें अत्यंत अभिनंदनीय होय. ( टाळ्या ) असो. आपणांस यापुढें जोमदार लोकमत तयार केलें पाहिजे. हें लोकमत योग्य रीतीनें व्यक्त व्हावयाचें म्हणजे मतदारांना योग्य व अयोग्य याची निवड करण्याचें ज्ञान उत्पन्न झालें पाहिजे. मुंबई इलाख्यांत ५।७ लाख लोकांना हा मतदारीचा हक्क मिळणार असल्यामुळें त्यांना योग्य शिक्षण देऊन स्वतःवरील जबाबदारी ओळखण्यास तयार केलें पाहिजे. ज्ञानाबरोबर मतदारांचें शील व चारित्र्य या सद्गुणांचीहि वाढ करण्यास झटलें पाहिजे. शील व चारित्र्य यांशिवाय राष्ट्र अधोगतीस जातें, हे महात्मा गांधींचे उद्गार मनन करण्यासारखे होत. राजकीय काम करणारी मंडळी व पोलिस यांचें नातें विळ्या भोंपळ्यासारखें कोठेंकोठें असतें पण सुदैवानें आम्हांस सौजन्य-युक्त असेच पोलिस अधिकारी मिळाले असल्यानें आमच्या कार्यांत आह्मांला त्यांपासून बिलकुल त्रास पोंचत नाहीं हें सांगण्यास आनंद

वाटतो. मी त्यांच्या सौजन्यपूर्ण वागणुकीबद्दल त्यांचे स्वागतमंडळातर्फे आभार मानतों. बंधुभगिनींनो शेवटीं पुन्हा एकवार आपलें स्वागत करून आतां आपण अध्यक्षाची निवड करण्यास लागावें असें मी सुचवितों.

## अध्यक्षांची निवड.

हा ठराव सभेपुढें मांडतांना बार्शीचे सुप्रसिद्ध वकील **रा. गोविंदराव टिळक** म्हणाले, " आपले मित्र प्रो. शिवराम महादेव परांजपे, एम्. ए., यांनीं या परिषदेचें अध्यक्षस्थान मंडित करावें ही सूचना आपल्यापुढें मांडण्यासाठीं मी उभा राहिलों आहें. प्रो. परांजपे हे एक अत्युत्तम वर्तमानपत्रकार आहेत हें सर्वांस माहीतच आहे. ते पूर्वी ' काळ ' या नांवाचें वर्तमानपत्र चालवीत असत. हें वर्तमानपत्र किती जोमदार होतें तें सांगण्याची फारशी जरूरी आहेसें मला वाटत नाहीं. रौलॅट कमिशननें मुंबई इलाख्यांतील ज्या कर्तबगार वर्तमानपत्रांवर पुष्पांजली वाहिली आहे त्यांतच काळ पत्राचा प्रमुखपणें उल्लेख आला आहे. प्रो. परांजपे यांच्या वर्तमानपत्रानें देशांतील गेल्या २५।३० वर्षांतील राजकारणाला चांगलाच रंग आला होता. पुण्यांतील प्रत्येक सार्वजनिक कामांत त्यांनीं प्रमुख भाग घेतला असून देशांतील लोकमत तयार करण्याची महत्वाची व बिकट कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजाविली आहे. त्यांच्या अंगीं दुसरीहि एक विलक्षण शक्ति आहे व ती म्हणजे वक्तृत्वाची होय. त्यांच्या वाणीमध्यें अशी विलक्षण आकर्षणशक्ति आहे कीं ते घटकाभर सर्वांचीं अंत:करणें आत्मवश करून घेऊन तुम्हां आम्हांला आपल्या वक्तृत्वानें गुलाम करून ठेवतील ही मी खात्री देतों. असो वक्तृत्व व लेखन या दोन्ही सगुणांनीं युक्त अशा पुढाऱ्यास आपण एकमतानें अध्यक्ष म्हणून निवडावें अशी सर्वांस विनंति करतों. " ( टाळ्या )

या सूचनेस अनुमोदन देतांना **सोलापूरचे रा. सामंत** वकील म्हणाले:—" प्रो. परांजपे हे दुसऱ्यांना गुलाम करतात असें रा. टिळक म्हणाले, पण त्यांच्या म्हणण्याचा खरा अर्थ असा कीं ते दुसऱ्यांना आत्मस्वरूप कळवून देतात. ते काळकर्ते आहेत म्हणजे भविष्यकाळकर्ते आहेत—भूतकाळकर्ते नव्हत. भूतकाळ हा आपण चटकन् विसरतों, पण भविष्यकाळांत एक प्रकारची मोहक जादू भरलेली असते. हें जग जें चाललें आहे तें केवळ आशेवर ! प्रो. परांजपे हे हिंदुस्थानची राष्ट्रीय आशा उत्पन्न करून ती कायम ठेवण्याचें काम करीत आहेत. त्यांचें नांव शिवराम तें अभेद दाखवितें. ते आज येथें भरलेल्या एका शिक्षणपरिषदेला गेले होते यावरून त्यांची दृष्टि किती अभेद आहे तें दिसून येईलच. असा सर्व बाजूंनीं योग्य माणूस आपण अध्यक्षस्थानीं निवडालच यांत संशय नाहीं. " ( टाळ्या. )

याच सूचनेस पुष्टि देतांना **रा. भगवंतराव वैद्य** म्हणाले:—" आपण सर्वजण अध्यक्षांचें सुरस भाषण ऐकावयास उत्सुक झालां असाल हें मी जाणतों

प्रो. परांजपे यांचें नांव अध्यक्षस्थानीं सुचविण्यांत स्वागतमंडळानें फारच शहाणपणा दाखविला आहे. त्यांच्या नांवांत ज्याप्रमाणें शिव आणि राम म्हणजे शिव आणि विष्णु यांचें ऐक्य झालें आहे तसें त्यांच्या अध्यक्षत्वानें लिंगायत व आम्ही यांचेंहि अभेद होईल अशी मला आशा वाटते." (टाळ्या.)

नंतर हा ठराव एकमतानें पास झाल्याचें रा. साने यांनीं जाहीर केल्यावर प्रो. परांजपे यांनीं टाळ्याच्या प्रचंड कडकटांत व 'वंदेमातरम्' च्या जयघोषांत अध्यक्षस्थान स्वीकारलें व रा. साने यांनीं त्यांस पुष्पहारानें मंडित केलें. नंतर स्वागत मंडळाचे चिटणीस रा. कान्हेर वकील यांनीं परिषदेबद्दल पत्रें व तारा ज्या गृहस्थांकडून आल्या त्यांपैकीं कांहीं नांवें सांगितलीं तीं:—

१. प्रोफेसर विजापूरकर–तळेगांव.
२. सर्व्हेंटस ऑफ इंडियाचे रा. देवळे–मुंबई.
३. रा. व्यंकटेश गणेश जावडेकर–पैसाफंड प्रचारक.
४. रा. कौलजगी वकील–विजापूर.
५. रा. हिराचंद अमीचंद शहा–सोलापूर.
६. नामदार कामत–पुणें.
७. रावबहादूर वैद्य-कल्याण.
८. रा. विठ्ठल रामजी शिंदे–डिप्रेसमिशन, पुणें.
९. नामदार उपासनी–धुळें.
१०. दिवाण बहादूर गोडबोले–पुणें.
११. रा. आगाशे, वकील–सातारा.
१२. रा. एन. डी. सावरकर–दादर.
१३. रा. तात्या नेमिनाथ पांगळ, मुंबई.
१४. प्रेसिडेंट पूर्व खानदेश जिल्हा परिषद–भुसावळ.
१५. डॉ. वेलकर–मुंबई.
१६. डॉ. साठ्ये–मुंबई.
१७. रा. रामसिंग डोंगरसिंग–सोलापूर.
१८. रा. नटवरलाल मुजुमदार–सोलापूर.
१९. रा. अण्णासाहेब नेने–मुंबई.
२०. नामदार खापर्डे–उमरावती.

## अध्यक्षांचें भाषण.

नंतर अध्यक्षांनीं दीड तासपर्यंत अत्यंत सुरस असें वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. ते म्हणाले:—" महेशबांधहो, आपली अध्यक्षस्थान स्वीकारण्याची आज्ञा शिरसावंद्य मानतों. हें स्थान स्वीकारलें म्हणजे मी या स्थानाला योग्य आहें म्हणून मात्र नव्हे. माझ्या प्रिय देशांतील प्रियतर देशबांधवांचें जें संमेलन त्याची जी इच्छा त्याप्रमाणें वर्तन करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. मी आपल्या आज्ञेच्या व इच्छेच्या बाहेर नाहीं. माझ्यासंबंधानें रा. टिळक यांनीं गुलामगिरीचा उल्लेख केला. त्यांच्या भाषणांतील अलंकार मला कळतो. पण मला एवढें येथें सांगितलें पाहिजे कीं, आपण येथें कोणाला गुलाम करण्याकरितां जमलों नसून जर कोणी कोणाचे गुलाम असतील तर ती स्थिति बंद करण्याकरितां जमलों आहों. (टाळ्या) माझा शब्दाबद्दल आक्षेप नाहीं, मीं हा उल्लेख फक्त आजचा गुलामगिरीविषयींचा तिटकारा व्यक्त करण्याकरितां केला आहे. आज जगांत काय चाललें आहे ? आज जगांत पूर्वींचीं बंधनें तुटलीं जात असून नवीं बंधनें निर्माण होत आहेत. हाच या शतकाचा धडा आहे. नवीं बंधनें कोणतीं व जुनीं कोणतीं ? जुनीं गुलामगिरीचीं बंधनें नष्ट होत असून नवीं प्रेमाचीं—शुद्ध प्रेमाचीं—बंधनें निर्माण होत आहेत. ( टाळ्या. )

स्वागतमंडळाचे अध्यक्ष रा. रामभाऊ साने यांनीं आपल्या भाषणांत ज्या समता व स्वातंत्र्य या तत्त्वांचा उल्लेख केला तीं आतां पाश्चात्य देशांत नुस्तीं बोललीं जात नसून तीं इतःपर कृतींत यावीं असा प्रयत्न अमेरिकेचे प्रेसिडेन्ट वुइल्सन हे करीत आहेत. हीं प्रे. वुइल्सन साहेबांचीं तत्त्वें आह्मीं सर्वांनीं, अडाण्यांनीं तसेंच समजंस लोकांनीं समजावून घेतलीं पाहिजेत. आपण आतां गुलामगिरीची जुनी पण चिरपरिचित भाषा टाकून देऊन प्रे. वुइल्सन यांची नवी भाषा बोलण्यास शिकलें पाहिजे. पुनः जगांत लढाई म्हणून उपस्थित होऊं नये म्हणून प्रे. वुइल्सन यांनीं नवें स्वयंनिर्णयाचें तत्त्व प्रतिपादन करण्यास सुरवात केली आहे. आतां यापुढें या जगांत कोणीहि कोणाचा गुलाम रहाणार नाहीं असा नगारा प्रे. वुइल्सन यांचें स्वयंनिर्णयाचें तत्त्व ' डुम् डुम् ' वाजवीत आहे. यावेळीं आपण कानांत खुंट्या न घालतां अंधारांतून उजेडांत आलें पाहिजे. गुलामगिरीचा इतका उल्लेख करून मी आतां मुख्य भाषणाकंडे वळतों.

आजची परिषद् ही सोलापूर जिल्ह्याची दुसरी परिषद् आहे. पहिली परिषद् १७ महिन्यापूर्वी माझे मित्र रा. नरसोपंत केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. १९१७ साल जाऊन आतां १९१९ साल सुरू झालें असून जगांत गेल्या १७ महिन्यांत अनेक उलाढाली झाल्या आहेत. त्यावेळच्या व आजच्या परिस्थितींत जमीन—अस्मानाचें अंतर पडलें आहे. त्यावेळीं लढाई चालू होती तर ती आज बंद आहे. कांहीं दैविक अशा अचानक रीतीनें आजचा योग घडून

आला आहे. त्यावेळीं मँटिग्यु साहेबांनीं 'आम्ही हिंदुस्थानांतही लौकरच जबाबदार राज्यपद्धति देऊं' असें आश्वासन दिलें होतें. त्यानंतर त्यांनीं या देशांत येऊन व सर्वांच्या मुलाखती घेऊन आपला सुधारणांचा रिपोर्टहि प्रसिद्ध केला. गेल्या १७ महिन्यांत कॉंग्रेसच्या कलकत्ता–मुंबई–दिल्ली अशा तीन ठिकाणीं बैठका झाल्या. या तीन बैठकी म्हणजे आमच्या स्वराज्यविषयक प्रयत्नाच्या या तीन टप्याच्या जागाच होत. कलकत्त्यास मिसेस बेझंट या अध्यक्ष होत्या व दिल्लीस ना. पं. मदनमोहन मालवीय हे अध्यक्ष होते. १९१७ च्या डिसेंबर महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें जें एक कमिशन नेमलें तें रौलेटकमिशन या नांवानें प्रसिद्ध आहे. १९१८ च्या जानेवारी महिन्यांत त्यानें कामाला सुरवात केली व तें झटपट उरकूनहि टाकलें. आमचा नेहमींचा अनुभव असा आहे कीं, लोकहिताचीं कमिशनें हीं बैलगाडींत बसून मंदगतीनें चालत असतात ! पण रौलेटकमिशन कदाचित् हुकुमावरून स्पेशलगाडींत बसून चालू झालें व त्यानें आपलें काम २।३ महिन्यांत पारहि पाडलें. इंडस्ट्रियल कमिशनचा रिपोर्ट त्यावेळीं छापावयास गेला होता पण हा रिपोर्ट पुढें होतांच तो रिपोर्ट मागें पडला ! आपणाला सदोदितचा अनुभव आहेच कीं स्टेशनवर एकाच वेळीं दोन गाड्या आल्या म्हणजे मालगाडी मागें पडून राहते व मेलगाडी झपाट्यानें निघून जाते तसें हें झालें ! ( टाळ्या व हंशा ). हा रिपोर्ट प्रसिद्ध करण्याची हिंदुस्थान सरकारनें घाई केली याचें कारण असें कीं, त्यावेळीं जय केव्हां मिळेल व तह केव्हां होतो याचाच नेम राहिला नव्हता हें होय. लोकहित हें त्या घाईचें कारण नव्हे. जय झाला तर हिंदुस्थान सरकारचा गाडा कसा हांकणार ही त्यांना भीति पडल्यामुळें त्यांनीं घाईघाईनें हा रौलेटकमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध केला. आंबा आज आढींत पडला असून बिलें पास करण्याची घाई सरकार रात्रीं बेरात्रीं कौन्सिलें भरवून करीत आहे. विलायतेंत रात्रींच्या पार्लमेंटच्या बैठकी भरतात पण त्या लोकहिताचीं बिलें घाईनें पास करावयाचीं असतील तेव्हां ! पण आपल्या वरिष्ठ कायदेकौन्सिलांत जीं बिलें झोंपमोड करून पास करण्यांत येणार आहेत तीं कोणालाच नकोत ! ! हीं बिलें अझूनहि पास झालेलीं नाहींत पण सरकारला हीं बिलें परत घेण्याची सद्बुद्धि होईल अशी आशा कांहीं दिसत नाहीं. सुधारणांचें बिल लवकरच पार्लमेंटपुढें येणार असें म्हणतात पण त्यापूर्वीं हीं रौलेट बिलें पास झाल्यास आमच्या मनाची स्थिति काय होईल इकडेहि सरकारनें लक्ष देणें अवश्य आहे. गेल्या ३।४ महिन्यांत लोकमतांत झपाट्यानें फरक पडून येत आहेत त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. मुंबईस भरलेल्या स्पेशल कॉंग्रेसच्या बैठकींत तडजोडीनें असें ठरलें होतें कीं, कायदा, पोलिस व न्याय या खात्यांशिवाय इतर सर्व प्रांतिक खातीं सुधारणांत मागावीं. पण दिल्लीस पूर्ण प्रांतिक स्वराज्याची मागणी करण्यांत आली आहे. मुंबई इलाख्याच्या कायदेकौन्सिलांतील प्रतिनिधींनींहि आपल्या

खलित्यांत पूर्णप्रांतिक स्वराज्याची मागणी केली आहे. आपली जिल्हासभा ही प्रांतिकपरिषदेचाच भाग आहे अशा दृष्टीनें आपले प्रांतिक कायदेकौन्सिलांत प्रतिनिधी आपल्यातर्फे कोणती मागणी करतात तें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

गेल्या पंढरपूरच्या परिषदेंत आम्हीं असा ठराव पास केला होता कीं 'देवा, या महायुद्धांत ब्रिटिशांना विजय दे !' आनंदाची गोष्ट ही कीं, आपली करुणा ऐकून विठोबा पावला व आतां ब्रिटिश सरकारास पूर्ण विजय मिळाला आहे. ( टाळ्या. ) ब्रिटिश सरकारास जो हा विजय मिळाला आहे त्यांत आपला हा जिल्हाहि अंशभागी आहे. नव्या गव्हर्नरसाहेबांनीं जें परवां भाषण केलें त्यांत मराठ्यांच्या मर्दुमकीची भरपूर स्तुति केली आहे. या जिल्ह्यांतील मराठ्यांना गव्हर्नरसाहेबांनीं त्यांचे मानलेले आभार कळविणें आपलें काम आहे. आम्हां मराठ्यांच्या अंतःकरणांत देशाभिमानाची स्फूर्ति उत्पन्न झाली व मनगटांत किती जोर आला हें कळविण्याकरितां गव्हर्नरसाहेबांनीं हें भाषण केलें आहे. मुंबई इलाख्यांत एकंदर २० जिल्हे असल्यामुळें आपल्या सोलापूर जिल्ह्याच्या वांट्याला १/२० स्तुति येतेच ! पाश्चात्य रणभूमीवर गाजविलेला हा तुमचा हक्क तुम्ही विसरतां कामा नये. आपल्या प्रांतांतून महायुद्धासाठीं धान्य गेलें, पैसे गेले व हातावर शिरकमलें घेऊन लोकहि लढावयासाठीं गेले हें सरकार विसरलेलें नाहीं. हल्लीं महायुद्धांत आम्ही किती व कशी मदत केली याविषयीं जे लेख प्रसिद्ध होत आहेत ते कातडीं, सागवानी लांकूड, धान्य, रेल्वेचे डबे इ. सर्व प्रकारच्या आंकड्यांनीं भूषित केले जात आहेत. आपल्या इकडून महायुद्धासाठीं देशाबाहेर डबे गेले, धान्य गेलें हें ठीकच झालें. या देशांतून ५० लक्ष टन धान्य बाहेर गेलें असें ना. शुक्ल यांस उत्तर मिळालें आहे. हे फक्त प्रसिद्ध झालेले आंकडे आहेत. अजून जे आंकडे अप्रसिद्ध असतील तेहि लौकरच प्रसिद्ध होतील. आतां मोठ्या आनंदाची गोष्ट म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे कीं, आस्ट्रेलियांतून गव्हांच्या बोटी येत आहेत. गव्हांच्या बोटी या देशांत उतरतात पण गव्हाचा भाव मात्र अजून उतरत नाहीं, हें कसें ? साम्राज्यावर प्रसंग येईल तेव्हां मदत करणें हें राजनिष्ठांचें कर्तव्यच होय. आम्हीं त्यावेळीं डबे इंजिनें दिलीं ही आनंदाची गोष्ट झाली खरी, पण आतां आमच्यावर प्रसंग आला तेव्हां मात्र मालाची नेआण करण्यास तीं परत येत नाहींत, पण आपल्याजवळ मालाची नेआण करण्यास डबे, इंजिनें नाहींत ही उणीव कंट्रोलची पद्धत भासूं मात्र देत नाहीं. अज्ञान हें मोठेंच सौख्य आहे. आजपर्यंत आम्ही मँचेस्टरच्या मालावर कंट्रोल ठेवा म्हणत होतों पण आम्हांला सांगण्यांत येई कीं 'Free Trade !' 'कंट्रोल' हा नवा शब्द लढाईत जन्मास आला आहे. आतां माल घ्यावयाचा म्हणजे Priority Certificate घावें लागतें. पण यापूर्वीच लष्करी मागणीला सर्टिफिकेट देण्यांत मात्र येतें आणि ती मागणी भागली म्हणजे मग आपलेंच सर्टि-

फिकेट पाहिलें ! हल्लीं दुष्काळ आहे ही गोष्ट लक्षांत घेतां हा कंट्रोल कमी होऊन व्यापार जास्त खुला होईल तर बरें असें म्हणण्याची वेळ आली आहे.

गेल्या परिषदेंत रिक्रूटिंगचा ठराव आपण पास केला होता पण आज तो ठराव पास करण्याची जरूरी राहिली नाहीं. त्यावेळीं मराठे लोक बाजारांत धरले जात होते म्हणूनच आज गव्हर्नर साहेबांनीं आपलें अभिनंदन केलें आहे. पण हें अभिनंदन केवळ शाब्दिक नाहीं. आतां आम्हांस या अभिनंदनाचें बक्षिस म्हणून रौलेट बिलें मिळणार आहेत ! (धि:कार !) मनुष्याच्या आठवणी इतक्या क्षण-भंगुर असतात काय ? अल्पायुषत्वाचा रोग आठवणींना कां जडला आहे कोणास ठाऊक ! ( हंशा. ) या रौलेट बिलांना प्रतिकार करण्याची चळवळ महात्मा गांधींनीं मुंबईस सुरू केली आहे इकडे सरकारनें दुर्लक्ष करूं नये. सरकार कौन्सिलांत रौलेट बिलें पास करण्याचा जितका दुराग्रह धरील तितका सत्या-ग्रहालाही लोकांचा पाठिंबा मिळणार आहे. (टाळ्या). सत्याग्रहाचा प्रश्न अजून पूर्णपणें सोडविण्यांत आलेला नाहीं पण हा विचार पुरा होतांच गांधींच्या चळव-ळीला सर्व लोक जोरानें पाठिंबा देतील यांत शंका नाहीं.

हल्लीं दुष्काळानें इतकें उग्र स्वरूप धारण केलें आहे कीं, चाऱ्याच्या अभावीं जनावरें पटापट मरूं लागलीं आहेत. अजून माणसें मरूं लागलीं नाहींत. पण आपण आपलें कर्तव्य विसरून जनावरांसारखें वागूं लागलों तर माणसेंहि मरूं लागतीलच ! सरकारच्या खजिन्यांत लक्षावधींची शिल्लक असल्याचें या बजेटांत दाखविण्यांत आलें आहे. या शिलकेच्या बजेटास प्रॉस्पेरिटी बजेट म्हणतात.पण दुष्काळांत प्रॉस्पेरिटी बजेट असणें आनंदाचेंच होईल का ? लढाईच्या वेळीं या देशांतून परदेशांत धान्य गेले व आतां इकडे दुष्काळ पडला म्हणून ऑस्ट्रेलियां-तून गहूं येत आहे ! हा प्रकार म्हणजे Carrying coal to Newcastle अशासारखाच द्राविडी प्राणायामाचा प्रकार नव्हे काय ? गुरांना आज चाऱ्याची टंचाई पडली आहे,पण लष्करी घोड्यांना गवत पुरलें म्हणजे मग गुरांनाहि डेपों-तून चारा मिळेल ! पण यावेळीं सरकारनें हेंहि लक्षांत ठेवावें कीं, जनावरें जगलीं तरच पुढें शेती होईल व शेती पिकली तरच सरकारास सारा मिळेल ! अर्थात् गुरांना जगण्याइतका चारा मिळूं शकेल अशी सरकारनें व्यवस्था करणें त्यांनाच हितावह होय. ना. पारेख यांनीं कौन्सिलांत ठराव आणला होता कीं, सर्वच जनावरांना गवत द्या. गुजराथी लोक हे स्वभावतःच अत्यंत दयाळू असल्यामुळें त्यांचें अंत:करण प्राणिरक्षणासाठीं हळहळत असतें. ना. पारेख यांच्या ठरावावर वादविवाद झाला त्यावेळीं कांहींनीं असा कोटिक्रम लढविला कीं, उपयोगी जना-वरेंच तेवढीं अगोदर जिवंत ठेवावीं ! ठिकठिकाणीं फॉरेस्टें मोकळीं करण्यांत आलीं आहेत तेव्हां तेथें जनावरांनीं जाऊन गवत असलें तर खुशाल खावें आणि पाणी मिळालें तर प्यावें ! सरकार अशा तजविजी करीत आहे. शिक्षणा-कडे वळलों तर बरीच आनंदाची प्रगति दिसून येते. सर इब्राहिम रहिमतुल्ला यांनीं

शिक्षण खात्याकडे बऱ्याच देणग्या दिल्या आहेत म्हणून त्यांचे आभार मानणें जरूर आहे. सरकार प्राथमिक शिक्षणाकडेहि लक्ष देऊं लागलें आहे. ना.गोखले हे प्राथमिक शिक्षणाकरितां भांडले तेव्हां आतां सरकारनेंहि इकडे लक्ष देण्यास सुरवात केली आहे. सरकारनें आतां असें अभिवचन दिलें आहे कीं, प्रथम एक हजार लोकवस्तीच्या ठिकणीं शाळा उघडूं व नंतर पांचशें लोकवस्तीच्या ठिकाणीं-ही उघडूं. या अभिवचनाबद्दल सरकारचे आभार मानले पाहिजेत. अशाच प्रका-रानें सरकार दुय्यम व उच्च शिक्षणासंबंधीं प्रयत्न करीत आहे. तरी पण प्रत्येक जिल्ह्याला एक एक कॉलेज व प्रत्येक तालुक्याला एक एक हायस्कूल उघडण्यांत आलीं पाहिजेत, अशी लोकांची इच्छा आहे. यंदांच्या बजेटावरून ही इच्छा सफळ होण्याचा रंग दिसतो. पण शिक्षणाकडे जो पैसा खर्च होतो तो कोणत्या खात्यांतून मिळतो ? सरकारनें सांगितलें आहे कीं, दारूच्या खात्याचें उत्पन्न वाढतें आहे. दारूच्या खात्यांत जो पैसा मिळतो तो शिक्षणासारख्या पवित्र कार्याकडे खर्च होतो हें सुदैव होय! लिलांवाच्या पद्धतीनें दारूखात्यांत जो पैसा मिळतो तो शिक्षणाकडे खर्च होतो म्हणून आनंद मानावा कीं लोक दारू जास्त पितात म्हणून दुःख करावें हेंच कळत नाहीं. सरकारनें ह्या दोन खात्यांचे हिशेब जवळ जवळ मांडलेले नाहींत हें खरें तरी त्या दोन खात्यांचा एका ठिकाणीं विचार केला तर मनाची स्थिती चम-त्कारिक झाल्याशिवाय रहात नाहीं. कॉलेजें वाढावीं अशी इच्छा असल्यास " परमेश्वरा, लोक भरपूर दारू पिऊं देत " अशी प्रार्थना करण्याचा प्रसंग आला आहे. आपलीं मुलें अज्ञान राहोत, पण प्रौढ माणसें दारू न पिवोत. हे माझ्या प्रिय देशबांधवांनो, दारू पिण्याचें ज्ञान असण्यापेक्षां शिक्षणाचें अज्ञान असलेलें फार बरें! दारूच्या खात्याचें दिवाळें वाजलें तरी हरकत नाहीं पण दारू पिऊं नका, अशी प्रार्थना करण्याची वेळ आलेली आहे. यांत्रिक धंद्याचें शिक्षण आपणांला विशेष पाहिजे आहे. पण या बाबतींत सरकार जरूर तितकी तत्परता दाखवीत नाहीं असेंच म्हणणें भाग आहे. सरकार विजापुरास एक टेक्निकल स्कूल काढणार आहे पण अशा शाळेची जरूरी विजापुरपेक्षां सोलापुरासारख्या व्यापारी शहरां-तच अधिक आहे. सरकारनें आरोग्यखात्याकडेहि जास्त लक्ष पुरविणें अवश्य आहे. नुसत्या इन्फ्लुएंझानें या देशांतील साठ लक्ष लोक प्राणास मुकले ! वरील गोष्टी मीं आपल्यापुढें विचारासाठीं मांडल्या आहेत त्यावरून योग्य तीं अनुमानें आपण काढालच.

पूर्वीची परिषद् व हल्लींची परिषद् यामध्यें आणखीहि एक महत्वाची गोष्ट घडून आली आहे. पण तिचा उल्लेख मी शेवटीं करीन. मध्यंतरीं लो. टिळकांच्या प्रमुखत्वाखालीं ( टाळ्या ) होमरूल डेप्युटेशन् जाणार होतें, नव्हे, तें निघालेंहि होतें. हिंदुस्थानचा सर्व भूप्रदेश आक्रमून, रामे-श्वर ओलांडून, पुढेंहि गेलें होतें; पण त्यापुढें जाण्यास परवानगी न मिळाल्या-

कारणानें त्यांना परत यावें लागलें. त्यानंतर लो. टिळक चिरोलकेससाठीं पुन्हां विलायतेस गेले आहेत. त्यांच्या केसचा निकाल काय झाला हें आपणांस माहीतच आहे. लो. टिळक येथें प्रत्यक्ष नसले तरी आमच्या सर्वांच्या अंतःकरणांत ते या क्षणाला आहेतच. ( टाळ्या ). गेले सतरा महिने आपण सर्वांनीं स्वदेशसेवेचें व्रत नेटानें चालविलें आहे, हें पाहून त्यांनाहि आनंद होईल. कायद्याच्या मर्यादेंत राहून राजाबद्दल आदरबुद्धि बाळगून देशाची सेवा करावी ही त्यांची शिकवण आहे. या कामीं आपणांस परमेश्वराच्या साह्याची फार जरूरी आहे. पंढरपुरास कमरेवर हात देऊन परमेश्वर उभा होता, पण येथें परमेश्वराचें तटस्थ स्वरूप सुदैवानें बदलून गेलें आहे. गेल्या सतरा महिन्यांत परमेश्वराच्या कृपेमध्यें जो हा फरक झाला तो सर्वांनीं ध्यानांत ठेवला पाहिजे. बार्शी हें शहर अंबरीष राजाचें आहे. येथें भगवंताचें स्वरूप तटस्थ नाहीं. जेव्हां अंबरीष राजाचा छळ झाला तेव्हा भगवंतानीं सुदर्शन हातीं घेतलें. परमेश्वराचें स्वरूप अशा रीतीनें हस्तक्रियेपर्यंत बदललें आहे. दुर्वास म्हणजे दुर्वासनेची मूर्ती. त्याचा प्रतिबंध करण्याकरितां भगवंतानीं वैकुंठाहून धांव घेतली. असा परमेश्वरी कृपेंतील फेरबदल लक्ष्यांत घेऊन व परमेश्वराचा हेतु ओळखून आपणहि स्वस्थ बसतां कामा नये. हें लक्षांत ठेऊन आपण कार्याला लागलों तर आपणांस परमेश्वर साह्य करील व लवकरच हिंदीलोकांस जबाबदारीची राज्यपद्धति मिळेल. कॉंग्रेसनें मुसलमानांना स्वतंत्र रिप्रेझेंटेशन् दिलें आहे. आपण सर्व एकाच देशमातेचीं लेकरें आहों, तेव्हां आपणांस मिळालें म्हणजे त्यांत भेदभाव करणार नाहीं. आम्ही आमच्या देशबांधवांच्या संतोषार्थीत्यर्थ अर्धी भाकरी देऊं असा विश्वास एकमेकांवर एकमेकांनीं बाळगला पाहिजे. मतभेद विसरून एकीनें वागूं तर भगवान् खात्रीनें यश देतील ! ” (टाळ्या).

अशा रीतीचें अस्खलित व परिणामकारक असें अध्यक्षाचें भाषण झाल्यावर परिषदेचें पहिल्या दिवसाचें काम संपलें.

विषयनियामक कमिटीची सभा रात्रीं भरली होती.

# दिवस दुसरा.

## सकाळची बैठक.

### ठराव पहिला—इन्कमटॅक्स.

ता. १९ रोजीं सकाळीं ८ वाजतां परिषदेच्या दुसऱ्या दिवसाचे कामास प्रो. शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं सुरवात झाली. प्रथमतः पंढरपूरचे रा. भाटे यांनीं इन्कम्टॅक्स् बद्दलचा ठराव पुढें मांडला.

"इनकमटॅक्सची आकारणी पंचमार्फत व्हावी व पुराव्याचा बोजा ज्याचे-वर आकारणी झाली त्याजवर नसावा. १७ कलमाखालच्या नोटिशीच्या नमुन्यांत बदल करावा अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

ठराव वाचून दाखविल्यावर रा. भाटे म्हणाले, "अध्यक्ष महाराज व सभाजनहो, मला माहीत आहे कीं, मी बोललों तर इन्कम्टॅक्स वाढेल; पण तो जर दरवर्षी आपोआपच वाढत आहे तर मग बोलून तरी कां घेऊं नये. ज्याप्रमाणें मजूर मजुरीकरितां, भांडवलाले भांडवलाकरितां, शिक्षक पगारा करितां ओरड करून आपआपली थोडीफार दाद लावून घेत आहेत तर आम्हीच तेवढें स्वस्थ बसून कसें चालेल? इन्कम्टॅक्सचा प्रश्न हा नोकर-शाहीच्या पोटाचा प्रश्न असल्यामुळें आम्हीं नोकरशाहीविरुद्ध ओरड करून खुद्द बादशहापर्यंत दाद लावून घेण्याकरितां प्रयत्न केला पाहिजे. एक एकट्याची ओरड बादशहापर्यंत पोहोंचणार नाहीं म्हणून हा ठराव परिषदे-पुढें मांडण्यांत आला आहे. इन्कम्टॅक्स् हा एक रौलेटचा भाऊच आहे. एकदां आमच्या जिल्ह्याचे कलेक्टर पंढरपुरास आले होते व तेथील इन्-कम्टॅक्स्चा आंकडा ९००० नऊ हजार आहे असें पाहून ते म्हणाले, हा नऊ हजार आंकडा फार अपुरा आहे. तो वीस हजार तरी असला पाहिजे. झालें. पुढच्याच आकारणीस वीस हजार रुपये कर पंढरपुरावर लादण्यांत आला. ज्या कलेक्टरच्या सांगणीनेंच हा कर वाढला त्याच कलेक्टरपुढें अपील करून न्याय कसचा मिळणार? एखाद्या गरिबाजवळ हिशेबाच्या वह्या नसल्या म्हणजे सरकार आपलेंच म्हणणें खरें धरीत असतें. पुष्कळ मामलेदार आपल्या हिशेबाच्या वह्या ठेवीत नाहींत. मग त्यांच्या वह्या नाहींत म्हणून त्यांचें उत्पन्न पगारापेक्षां जास्त नाहीं कशावरून? पुष्कळ अंमलदार लांच खातात असें ऐक-ण्यांत असतें. मग त्यांना हा वह्यांचा नियम कां लावीत नाहीं? बरें ज्याच्या जवळ जमाखर्च असतो त्याला सरकार म्हणतें कीं, " तुमच्या हिशोबांत फारसा

नफा दाखविण्यांत आलेला नाहीं याबद्दल आश्चर्य वाटतें ! एका कमिशनरनें म्हटलें आहे कीं, भांडवलवाला जरी दुसऱ्याकडून भांडवल घेऊन उत्पन्नांतून व्याज देतो तरी प्राप्तीवरील कराची आकारणी करतांना नफ्यांतून व्याजाची वजावाट करण्याचें कारण नाहीं. यास तुम्ही न्याय म्हणाल काय ? ' तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील ' असें म्हणून कोकराला खाणाऱ्या इसापनीतींतील लांडग्याची आठवण यावरून कोणालाहि झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आतां या वर्षी सरकारनें उत्पन्नावरील कराची किमान मर्यादा दोन हजार ठरविली आहे ही आनंदाची गोष्ट होय. पण मागें पांचशें उत्पन्नाचे लोक ज्याप्रमाणें एकदम हजार रुपये उत्पन्नवाले झाले त्याप्रमाणेंच आज हजार रुपये उत्पन्नवाल्या लोकांचें उत्पन्न एकदम दोन हजार रुपये न होवो म्हणजे झालें ! सरकारचें स्केल वाढलें म्हणजे लोकांचें उत्पन्न कसें वाढतें हें एक आश्चर्यच आहे ! आमच्या पंढरपुरांतील हलवायांच्या घरांतील लक्ष्मी अशीच वाढली पण ती सरकाराला दिसली तरी मालकांना मात्र दिसत नाहीं ! पंढरपूरचा इनकमटॅक्सचा वसूल बेसुमार वाढविला गेल्यामुळें, लोक सतावले आहेत. कांहीं लोकांचा माल लिलांवांत गेला पण साखरेच्या गोडीलाहि कोणी लांचावत नाहीं आणि लिलांवांतील साखर कोणी विकत घेत नाहीं हा तरी म. गांधींच्या पुण्याईचा प्रभाव नसेल कशावरून ? ( टाळ्या ) केसरींत यासंबंधाची ओरड झालेली आहे. इन्कमटॅक्सचें अपील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेलें असतां कोणीं वॉरलोन दिलें नाहीं, कोणी आपला मुलगा रिक्रूटभरतींत घातला नाहीं अशा सबबीवर इन्कमटॅक्सचीं अपिलें नामंजूर झालीं असल्याची तक्रार वरिष्ठ कायदेकौन्सिलांत करण्यांत आली होती. परंतु तेथें ' हा प्रश्न प्रांतिक सरकारच्या हातचा आहे ' असें उडवाउडवीचें उत्तर मिळालें ! पंढरपूरच्या रहिवाश्यांच्या उत्पन्नाची मुख्य बाब म्हणजे यात्रेकरू, पण ज्या यात्रेकरूंमुळें म्युनिसिपालिटीचें उत्पन्न वाढत नाहीं, रेल्वेचें उत्पन्न वाढत नाहीं त्यामुळें लोकांचें उत्पन्न तेवढेंच कसें वाढतें हा मौजेचा प्रश्न आहे.

आतां धान्याच्या जकातीची वाढ थोडीशी झाली आहे हें खरें; पण परिस्थिति लक्षांत घेतां ही वाढ लोकांच्या उत्पन्नाला हानिकारकच आहे असें दिसून येईल. म्युनिसिपालिटीची जकात मालाच्या किंमतीवर आकारली जात असल्यामुळें, महागाईमुळें जकातीचें उत्पन्न वाढलें असणें स्वाभाविक आहे. १९१७ सालीं जें इनकमटॅक्सचें उत्पन्न प्रथमतः साडे नऊ हजार होतें तें पुढच्याच वर्षी एकदम वीस हजार कसें झालें ? एकोणीसशेंसतरा सालीं इनकमटॅक्स देणारा प्रथम एकच हलवाई होता पण लगेच पुरवणी—यादींत एकाचे दहा हलवाई इनकमटॅक्स देण्यास पात्र कसे झाले ? एकोणीसशें सतरा सालीं एकहि सोनार इनकमटॅक्स देत नव्हता, पण १९१८ च्या यादींत ८ सोनारांचें उत्पन्न

एकदम वाढलें ! असे बरेच अद्भुत शोध पंढरपूरच्या अधिकाऱ्यांनीं लावले आहेत. या हकीगतीवरून पूर्वींची आकारणी आंधळेपणानें झाली होती कीं, नवीन अधिकारी फार डोळस आले आहेत याचाच उलगडा होत नाहीं. "डोळां घालितां अंगोळी एकाचीं तीं दोन झालीं" हें संतवचन तर या ठिकाणीं खरें झालें नसेलना ?"

या ठरावास अनुमोदन देतांना रा. बीडकर म्हणाले, "गुदस्तां विठोबाच्या अध्यक्षतेखालीं पंढरपूर येथें जी परिषद् झाली होती तिच्यापुढें हा ठराव मांडण्यांत आला होता. पण पांडुरंग कोपला असल्यामुळें यंदां पुन्हा आम्हांला भगवंताचें अधिष्ठान मागावें लागत आहे. इन्कमटॅक्सचा कायदा रौलेटचा भाऊ नसून प्रत्यक्ष तोच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. ! झटपट चौकशी, गुप्त चौकशी हीं सर्व या कायद्यांतहि आहेतच, अधिकारी म्हणाला कीं, इतका इन्कम्टॅक्स तुला दिला पाहिजे म्हणजे पुराव्याचा बोजा माझ्यावरच पडणार ! इतकें उत्पन्न होत नाहीं हें कसें शाबीत करावयाचें ? न्यायाचीं सर्व तत्वें येथेंही बंदच आहेत. या कायद्यानें लोकांना दिवाणींत जातां येत नाहीं. रौलेट बिल सर्व स्वातंत्र्य खाणार आणि इन्कमटॅक्सचा कायदा संपत्ति खाणार ! जशी रौलेट बिलाविरुद्ध चळवळ आहे तशी याहि कायद्याविरुद्ध चळवळ झाली पाहिजे. अशा अन्यायी कायद्याची अंमलबजावणी काय होणार तें दिसतेंच आहे. मला पंढरपुरचा अनुभव आहे. तेथें अगोदर आकारणीचा आंकडा साडे नऊ हजारांचा वीस हजार ठरविण्यांत आला आणि नंतर उत्पन्नाचे आंकडे मांडण्यांत आले. एकदां आकार ठरला म्हणजे प्राप्तीचे आंकडेहि वाढलेच पाहिजेत ! हजार उत्पन्नाची आकारणी माफ झाली म्हणून आनंद मानण्याचें मुळींच कारण नाहीं. हजाराचे दोन हजार सहज होतात मग फायदा कोठें राहिला ? अपिलाच्या चवकशींत कांहीं कांहीं वेळ अधिकारी मुळींच दाद घेत नाहींत. पुरावा न ऐकतां ते उलट सांगतात कीं, पंढरपूरच्या अमुक देशभक्ताकडे जा म्हणजे काम होईल ( धिक्कार ). पण 'प्रसादचिन्हानि पुरः फलानि' या न्यायानें जनतेच्या हातीं स्वराज्याचे हक्क येण्याचें हें पूर्व चिन्ह तर नसेलना ? (टाळ्या). शंभरजणांना इन्कमटॅक्स वाढविला म्हणजे पंचाहत्तर तरी सांपडतीलच अशी ही आकारणी असते. नोटिसा करून सरकार उत्पन्नाचे आंकडे मागवितात, पण ते आकडे मान्य करायला बांधलें जात नाहीं. जे लोक मुदतींत फार्म भरून देत नाहींत त्यांना रोज दहा रुपये दंड भरावा लागतो हा न्याय कुठला ? उत्पन्नाच्या आंकड्याबरोबर सरकार 'तुम्ही ट्रस्टी वगैरे आहां कीं काय' हाहि तपशील विचारतें. पण या माहितीची काय जरूर ? अपिलाच्या वेळीं अम्मलदार कारणें लिहून द्यावयाला बांधलेले नाहींत मग पुढें तरी जावें कसें ? आम्हीं जमाखर्च कोणत्या रीतीनें ठेवावे असें विचारलें तरीहि सरकार खुलासा करीत नाहीं. इन्कमटॅक्सची आकारणी वाढली म्हणून आम्हीं कमिटी नेमून मुंबई सर-

कारकडे दाद मागितली. पण त्यांच्याकडून उत्तर आलें कीं, ' कलेक्टरचा शेरा आणा ' पण कलेक्टरनें शेरा दिला कीं या प्रकरणाची चवकशी करण्याचें कारण नाहीं, मग आमची दाद कोठें व कशी लागणार तेंच समजत नाहीं. ना. उपासनी यांनीं प्रश्न विचारला असतां सरकारनें उत्तर दिलें कीं, आम्हांस या प्रकरणांत हात घालण्याचें कारण नाहीं. आतां हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केला आहे. या अर्जाच्या उत्तराची वाट पाहात न थांबतांच अधिकाऱ्यांनीं मालाची जप्ती करण्यास सुरवात केली आहे. यंदा जास्त लोकांवर आकारणी झाली आहे ते काय सोनार, हलवाई, तेली सर्व एकदम श्रीमंत झाले ? आतां लोकांनीं निराश होऊन महात्मा गांधींचा मार्ग स्वीकारला आहे. जो माल जप्त झाला आहे त्यांत एका विधवाबाईचा साखर, कुंकूं वगैरे माल आहे. पण लिलांव घेण्यास कोणीच पुढें होत नाहींत. गांवची वस्ती अठावीस हजार आणि ज्या गांवावरील इन्कमटॅक्स वीस हजार त्या गांवांत तीनशें रुपायांच्या साखर, कुंकूं वगैरे मालास कोणी गिऱ्हाईक मिळत नाहीं यावरून सरकारनें केलेल्या अन्यायाची स्पष्ट कल्पना कोणासहि येणार आहे. हा माल आतां सोलापूर, मुंबईलाही जाईल पण सर्वांना अन्याय पटला आहे हें सरकारनें पूर्ण ध्यानांत ठेवावें ! ज्या शेंसवाशें लोकांनीं इन्कमटॅक्स दिला नाहीं त्यांचें म्हणणें जर खोटें ठरलें तर मी एकटा दंडासकट पांच साडे पांच हजार रुपये भरीन ! ( टाळ्या ). सोलापूरलाही हाच प्रकार चालला असून तेथें कांहीं कांहीं लोकांचें उत्पन्न एकदम दहावीस पटीनें वाढलें आहे. शेवटची दाद मागण्याकरितां आम्ही जनतेपुढें आलों आहों. आमचा माल ज्यावेळीं सोलापूर बार्शीकडे लिलांवाला जाईल त्यावेळीं तेथेंहि त्यांस कोणी गिऱ्हाईक न मिळो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे ! ( टाळ्या ) आज जो प्रसंग पंढरपूरकरांवर आहे तोच उद्यां इतरांवरहि येण्याचा संभव आहे हें लक्षांत ठेवा. आम्ही तत्वासाठीं भांडत आहों हें लक्षांत घेऊन अन्याय दूर करण्यास सर्वांनीं अधिकाऱ्यांना भाग पाडलें पाहिजे. ''

या ठरावास पुष्टि देतांना अकलूजचे वकील रा. घडफळे म्हणाले " एका गृहस्थाचें, उडाविण्याची दारू विकण्याचा परवाना रद्द झाला तरी त्याचें उत्पन्न धरलें जात असे ! मला परवाना मिळाला नाहीं असें त्यानें शपथेवर सांगितलें तरीहि त्याच्याजवळ पुरावा मागण्यांत आला. शपथेवर सांगितलें असतांहि अधिकारी विश्वास ठेवीत नाहींत व पुराव्याचा बोजा लोकांवर लादतात ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय ! "

याच ठरावास पुष्टि देतांना रा. अण्णासाहेब सुलाखे म्हणाले " हा सरकारच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे मग अशा वेळीं सरकार आंधळें झालें तर त्यांना दोष तरी कसा द्यावा ? ग्यानबा मुंढें या माणसाला वेड लागून एक वर्ष झालें तरीहि त्याच्या बायकोवर इन्कमटॅक्सची आकारणी झाली व जप्ती आली अशी

आणखी कित्येक वेढींवांकडीं उदाहरणें सांपडतील. युरोपियन अधिकाऱ्याकडे अपील गेलें तर तो न्यायबुद्धि थोडी तरी दाखवितो पण नेटिव डेप्युटोकडे अपील गेलें तर एक पैसाही सुटत नाहीं. हा व्यक्तीकडे दोष नाहीं पण सरकारी नोकरांची परंपराच इतकी घाणेरडी झाली आहे ! नेटिव डेप्युटी कलेक्टरांनीं फाजील भित्रेपणा दाखवूं नये अशाबद्दलहि गिल्ला करण्यांत आला पाहिजे. ”

माढे येथील कुळकर्णी वकील म्हणाले “ जुन्या नव्या कायद्यांतील फेरबदल मी आपल्या नजरेस आणणार आहें. खालीं आकारणी कमी झाली तर ती वाढविण्याचा अधिकार अपील कोर्टाला देणें हा अन्याय होय ! सप्लिमेंटरी बिल काढण्याचा अधिकार असल्याचा असिस्टंट जज्जांनीं शेरा मारला आहे. तें अपील अजून हायकोर्टांत चालूं आहे. मोहोळचे व्यापारी रा. बापुनाना शेंडे हे चारशें पांचशें रुपयेपर्यंत कर देतात पण अपिलांत त्यांच्या वह्या ग्राह्य धरल्या जात नाहींत हें योग्य आहे काय ? ”

ठराव सर्वानुमतें पास झाला.

---

## ठराव दुसरा.

### नोटिफाइड्एरिया.

“नोटिफाइड एरिया जेथें आहे तेथें प्रजेस कांहीं हक्क नाहींत याकरितां म्युनिसिपालिट्या किंवा सॅनिटरी कमिट्या स्थापन कराव्या अशी सरकारास या परिषदेची विनंति आहे.”

हा ठराव पुढें मांडतांना माढे येथील रा. देशमुख वकील म्हणाले, “नोटिफाइड्एरिया कमी करून तेथें म्युनसिपालट्या कराव्या किंवा निदान सॅनिटरी कमिट्या स्थापाव्या अशा आशयाचा हा ठराव आहे. हल्लीं नोटिफाइडएरियांत पांच मेंबरांपैकीं तीन मेंबर सरकारी नोकर असतात. हे तीन मेंबर म्हणजे मामलेदार, डॉक्टर व पोलिसपाटील हे असावयाचे हें ठरलेलेंच आहे. राहिलेले दोन मेंबर हे लोकनियुक्त असले पाहिजेत. पण त्यांचीं नांवें मामलेदार सुचवितात व कलेक्टर साहेब पसंत करतात. दुःखाची गोष्ट ही कीं, सरकारनें नेमलेले लोक हे पुष्कळदां सरकारी लोकांपेक्षांहि जास्त वाईट असतात असा अनुभव आहे. नोटिफाइडएरियांत लोकांना कांहींच हक्क नाहींत म्हणजे ही पद्धत टॅक्सेशन् वुइदाऊट रिप्रेझेंटेशन्सारखी अन्यायकारक आहे. ज्या घराला भाडें येत नसेल त्या घरावरील कर त्याच्या किंमतीवर बसवितात. कुर्डूवाडीला भाड्यावर किंवा किंमतीवर दोन्ही पद्धतींनें कर ठेवण्याचें घाटत आहे. नोटिफाइडएरियानें शाळा, दवाखाना हातीं घेतला म्हणजे त्यांचे खर्च चालविण्यासाठीं उत्पन्नहि वाढावेंच लागतें. मग उत्प-

ऱ्याची वाढ त्यांतल्या त्यांतच करण्यांत येते. मी सांगतों यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. नोटिफाइडएरियाऐवजीं सॅनिटरी कमिट्या किंवा म्युनिसिपालट्या झाल्या तर दगडापेक्षां वीट मऊ असें म्हणतां येईल. आमच्या संमतीशिवाय खर्च होणें गैर होय. ''

या ठरावास अनुमोदन देतांना कुर्डूवाडीचे श्री. रायमल शेटजी म्हणाले, "कुर्डूवाडीला डॉक्टराऐवजीं बार्शीलाइट रेलवेचे एजंट नेमण्यांत आलेले आहेत. कमिटींत रयतेपैकीं दोन असावे असा नियम आहे. पण ते निवडण्याचा मात्र लोकांना हक्क नाहीं, सरकारनें नेमलेले लोक तक्रार करूं लागले तर मामलेदार म्हणतात ' अहो, तुम्ही मेंबर मग तक्रार का करतां ? ' मी स्वतः एकदां मेंबर होतों. मीं कांहीं तक्रार केली तेव्हां कलेक्टरनें सांगितलें ' स्वतः मेंबरानें तक्रार करावी हें योग्य नाहीं. ' मीं म्हटलें कीं, मी न्यायाची मागणी करीत आहें तेव्हां मला त्यानें राजिनामा देण्यास सांगितलें. माझ्याऐवजीं सरकारनें एक इसम नेमला पण तो राजिनाम्याला भितो. ज्या गरीब लोकांना खायला कांहीं नाहीं तरी त्यांच्यावर कर बसविण्यांत आला आहे,' असें मीं कलेक्टरना दाखविलें. तेव्हां त्यांनीं मला तक्रारी ठरविलें. कमिटीच्या दोन हजार उत्पन्नापैकीं कारकुनच सहासातशें रुपये पगार घेतो, अशी स्थिति आहे. अधिकाऱ्यांच्या मर्जीला येईल तसा ते कारभार करतात. नोटिफाइडएरिया हा फार्स आहे. त्याऐवजीं सॅनिटरी कमिटी किंवा म्युनिसिपालिटी बरी.

**ठराव पास झाला.**

---

## ठराव तिसरा.

### आणेवारी.

"पिकांची आणेवारी पंचमार्फत व्हावी, व ती आणेवारी कायम करण्यापूर्वी एक महिना लोकांच्या हरकती मागविण्याकरितां प्रसिद्ध व्हावी अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे. ''

हा ठराव पुढें मांडतांना रोपळें येथील रा. शंकर गिरिराव कुळकर्णी म्हणाले " शेतसाऱ्याची आणेवारी पंचांमार्फत झाली पाहिजे, हल्लीं हें काम तालुक्याचे अधिकारी व पाटील कुळकर्णी करतात. पण शेतकऱ्याच्या म्हणण्याची चवकशी कोणीच करीत नाहीं. शेतकऱ्यांना जबर व्याज भरून सावकाराचे पैसे काढावे लागतात. त्याला अशा स्थितींत सारा भरणें मुष्किलीचें होतें. मुदतींत सारा भरला नाहीं म्हणजे त्यास दंड होतो व जमीन खालसा होईल अशी नोटीस दिली जाऊन ती खालसाहि केली जाते. इन्कमटॅक्स दिला

नाहीं तर दंडावर निभावतें. पण सारा दिला नाहीं तर मात्र गरीब शेतकऱ्यांची जमीन खालसा होते. एका गरिबाची जमीन खालसा झाली तेव्हां त्यांस असिस्टंट कलेक्टरनें माफी दिली, पण स्थानिक अधिकाऱ्यांनीं मात्र दाद घेतली नाहीं. आणेवारीसंबंधाची चवकशी पंचामार्फत झाली तर गरिबांना कांहीं तरी सवलत मिळेल."

या ठरावास करमाळ्याचे रा. कृष्णाजी रघुनाथ खिस्ती यांनीं अनुमोदन दिल्यावर पुष्टि देतांना रा. रामचंद्र वासुदेव कुळकर्णी म्हणाले "आमच्या गांवाला एक आणा पीक असतां आठ आणे पीक धरून चोपून सारावसुली करण्यांत आली आहे. पाटील, कुळकर्णी, मामलेदार हे आमचें म्हणणें मुळींच ऐकत नाहींत. बेंबळें या गांवीं एक मांग रहात होता. त्याला दोन मुलें होतीं. त्याचें एक चिमटीभरही स्वताचें उत्पन्न नव्हतें. त्याच्याजवळ पैसे द्यावयाला नसल्यामुळें तो शेवटीं गांव सोडून निघून गेला. लोकांची तक्रार ऐकून घेऊन पंचांनीं आणेवारी करावी. कलेक्टरकडून आलेले साऱ्याचे हुकूम चावडीवर डकवले गेले पाहिजेत."

**ठराव पास झाला.**

## ठराव चवथा.

### भोगावती नदीवरील पूल.

"भोगावती नदीस पूल व्हावा निदान कॉजवे तरी करावा अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. दिगंबर बाळकृष्ण डुबे म्हणाले "भोगावती नदीवर पूल नसल्यामुळें पॅसेंजरांस व मालाची नेआण करण्यास फार त्रास होतो. तेथें साधा कठडाहि घालण्यांत आलेला नाहीं. एकदां कलेक्टर येणार होते तेव्हां प्लॅटफार्म करण्याकरितां शेंदीडशें लोकांना केवढी खटपट करावी लागली ! यावरून पूल नसल्यामुळें गरीबरयतेला किती त्रास होत असेल याची आपणच कल्पना करावी."

या ठरावास रा. पंचाप्पा हब्बी यांनीं अनुमोदन दिल्यावर ठराव पास झाला.

## ठराव पांचवा.

### सब डिव्हिजनल ऑफिस.

"पंढरपूर हें सब डिव्हिजनल ऑफिसरचें हेड क्वार्टर असावें अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. धडफळे म्हणाले "पंढरपुरास सब डिव्हिजनल ऑफिसरचें हेड क्वार्टर ठेवल्यानें लोकांची फार सोय होणार आहे. हल्लीं हेड क्वार्टर सोलापुरास आहे. पण माळशिरस, धरमपूर, वगैरे लांबलांबच्या गांवांना त्यापासून फार ताप होतो, गाळशिरस हा गांव तर पूर्वी सातान्याकडे होता. सोलापूरसारख्या फार लांबच्या ठिकाणीं वकिलांना नेण्यास फार त्रास पडतो व खर्चाचाही फार मोठा बोजा पडतो. पंढरपूर हा गांव सर्वांनाच सोईचा पडेल म्हणून सब डिव्हिजनल ऑफिसरनें पंढरपूर हें आपलें हेड क्वार्टर ठेवावें."

या ठरावास अनुमोदन देतांना पंढरपूरचे रा. जोग वकील म्हणाले, "ठराव वादविवादाचा नाहीं. हा लोकांच्या सोईचा प्रश्न आहे. आमच्या मागणीविरुद्ध सरकारचीं काय कारणें असतील तीं आम्हांला कळतच नाहींत. म्हणून तीं आमचीं आम्हांलाच कल्पावीं लागतात. सब्‌डिव्हिजनल ऑफिसरला आषाढी—कार्तिकीला वगैरे वरचेवर यावेंच लागतें. म्हणून सरकारलाहि ही योजना सोईचीच होईल."

**ठराव पास झाला.**

## ठराव सहावा.

### हिंदू व युनानी वैद्यक.

"हिंदू व युनानी वैद्यकास सरकारांनीं, म्युनिसिपालिट्यांनीं व लोकलबोर्डांनीं प्रोत्साहन द्यावें व देशी दवाखाने स्थापावे असें या परिषदेचें मत आहे."

हा ठराव पुढें मांडतांना पंढरपूरचे डॉ. कानिटकर ह्मणाले—"मीं गेल्या परिषदेंत हाच ठराव पुढें आणला होता. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मध्यंतरीं इन्फ्ल्युएंझा आला पण त्यामुळेंहि हीच खात्री झाली कीं, परदेशी औषधांवर देशाची गरज भागणें शक्य नाहीं. मी स्वतः परदेशी औषधें वापरणारा असलों तरी मला असा अनुभव आला आहे कीं, खेडेगांवांना हीं औषधें पोंचूं शकत नाहींत. एकट्या इन्फ्ल्युएंझानें दहा वर्षांच्या प्लेगचें काम करून टाकलें आहे. त्या सांथींत शहरांपेक्षां खेड्यांतून जास्त माणसें मेलीं. अजून आयुर्वेदाला प्रत्यक्ष मान्यता मिळाली नसली तरी त्याच्या औषधांची फार जरूर भासत आहे. आणि आयुर्वेदीय औषधासंबंधीं सर्वांचीच एकवाक्यता आहे."

या ठरावास अनुमोदन देतांना रा. उंबरकरशास्त्री ह्मणाले—"इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत डॉक्टरांचीहि खात्री झाली आहे कीं, हिंदू व युनानी औषधाचा रोग्याला फार उपयोग होतो. जो ज्या देशांत उत्पन्न झाला त्याला त्या देशांतील औषधाचा जितका उपयोग होतो तितका परदेशांतील औषधाचा होत नाहीं."

**ठराव पास झाला.**

## ठराव सातवा.

### चाऱ्याचे डेपो.

"गुरांच्या चाऱ्याकरितां जे डेपो उघडण्यांत आले आहेत त्यापेक्षां ते अधिक ठिकाणीं उघडावे व जेथें डेपो आहेत तेथेंच पैसे भरून चारा मिळावा अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. शंकर गिरिराव कुलकर्णी म्हणाले, "तालुक्यांत सरकारनें चाऱ्याचे डेपो उघडले आहेत, पण पैसे भरावयास तालुक्यास जावें लागतें. एका ठिकाणीं चारा घ्यावयाचा व दुसऱ्या ठिकाणीं पैसे भरावयाचे या पद्धतीनें लांबलांबच्या लोकांना फार त्रास होतो. तरी डेपोवरच पैसे भरण्याची तजवीज करण्यांत आली पाहिजे."

या ठरावास शेट भगवानदास दौलतराम मारवाडी यांनीं अनुमोदन दिल्यावर रा. महालिंगाप्पा होसाळी म्हणाले, "डेपोपासून रक्कम भरण्याचें ठिकाण दूर असल्यामुळें लोकांना फार हालअपेष्टा भोगाव्या लागतात. हल्लींपेक्षां डेपोची संख्याही जास्त झाली पाहिजे. रस्त्यानें पूल वगैरे नसल्यामुळें अडचणी फार येतात. तरी डेपो जवळ झाल्यानें व डेपोवरच पैसे भरण्याची तजवीज झाल्यानें मुक्या जनावरांचे हाल वांचून लोकांचीहि सोय होईल."

**ठराव पास झाला.**

---

## ठराव आठवा.

### लोकलबोर्ड.

"जिल्हा लोकलबोर्ड व तालुका लोकलबोर्ड यांचे अध्यक्ष लोकनियुक्त असावे व लोकल बोर्डांनीं रस्ते दुरुस्त करावे व पिण्याच्या पाण्याच्या विहिरी अधिक कराव्या व या सुधारणांकरितां सरकारांनीं पैसे द्यावे अशी या सभेची विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. सुरनीस म्हणाले, "लोकल बोर्डाचे रस्ते दुरुस्त स्थितींत असले तर लोकांना फार उपयोग होणार आहे. या ठरावानें दुसऱ्या बऱ्याच ठरावांचें काम भागणार आहे. जिल्हा लोकलबोर्ड व तालुकाबोर्ड यांचे अध्यक्ष हे लोकनियुक्त असतील तर लोकांना आपलीं गाऱ्हाणीं मांडणें सोपें जाईल! सरकारी अधिकाऱ्यांपुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडण्याचें धैर्य लोकांना होत नाहीं. हल्लीं गांवोगांवच्या विहिरी दुरुस्त नसल्यामुळें लोकांना पाण्याचे हाल भोगावे लागत

आहेत, सरकारजवळ विहिरी बांधायला पैसे नाहींत, पण अधिकाऱ्यांच्या मोटारी जाण्यासाठीं व रस्त्यावरील खड्डे उचलण्याला माणसें ठेवण्यासाठीं मात्र पैसे आहेत. दामाजीपंताचें क्षेत्र मंगळवेढें येथें जाण्याचा रस्ता एकंदर तेरा मैलांचा आहे. सहा मैलांनंतर विसावा हें ठिकाण आहे. या ठिकाणापासून पुढें इतके श्रम पडतात कीं, तेथें विसावा घेणेंच अवश्य असतें. पुढें मानमोडी म्हणून ठिकाण आहे. या रस्त्यानें बसणारांचे व बैलांचे व जाणाऱ्या येणाऱ्यांचे अतिशय हाल होऊन त्यांची मानमोड होते. माननदी ओलांडून जाणें फार भयंकर आहे. अधिकारी ज्या रस्त्यानें जातात ते रस्ते उत्तम असतात. पण लोकांच्या सोईच्या रस्त्याकडे दुर्लक्ष केलें जातें. आषाढीच्या वेळीं रस्ते खांदून त्यांवर खडी टाकण्यांत येते. कारण यात्रेकरूंच्या जाण्यायेण्यानें आपोआपच खडी बसते. एकदां गव्हर्नर साहेब आले होते तेव्हां रस्ता उत्तम करण्यांत आला होता, म्हणून दरवर्षी एकदां या रस्त्यानें गव्हर्नर येतील तर गरीब प्रजेवर त्यांचे फार उपकार होतील."

या ठरावास अनुमोदन देतांना रा. भाटे म्हणाले—"मी दुर्दैवानें म्हणा किंवा सुदैवानें म्हणा, लोकल बोर्डाचा व्हाइस-प्रेसिडेन्ट आहें! एकदां कलेक्टर साहेबांनीं पंढरपूर तालुका बोर्डातून नऊशें रुपये सोलापुरास मागितले व हा ठराव कमिटीनें पासहि केला. मग हा न्याय कीं अन्याय? गोडगांवच्या धर्मशाळेचा उपयोग लोक तबेल्यासारखा करतात म्हणून तिचा लिलांव करा असें कलेक्टर साहेबांनीं फर्माविलें. पण मामलेदार या धर्मशाळेंत आपलीं घोडीं बांधून तिचा तबेला बनवितात त्याला लोक काय करणार? या धर्मशाळेंत लोकांचे पैसे गेल्यामुळें त्यांनीं पुष्कळ तक्रारी केल्या, शेवटीं रा. तात्यासाहेब खाजगीवाले हे पुढें झाल्यामुळेंच सदर धर्मशाळा वांचली. लोकलबोर्डाचे प्रेसिडेन्ट मामलेदार साहेब असतात आणि व्हाइस-प्रेसिडेन्टला कारकुनाचें काम करावें लागतें. अध्यक्ष लोकनियुक्त असेल तर लोकांनाहि आपल्या तक्रारी मनमोकळेपणानें मांडतां येतील. मामलेदारांच्या विरुद्ध बिचारे पाटील कुळकर्णी काय बोलणार?"

या ठरावास अनुमोदन देतांना रा. महालिंगाप्पा होसाळी म्हणाले:— "वैराग हा बार्शी तालुक्यांतील मोठ्या पेठेचा गांव आहे. पण तेथें पाण्याचा लोप जाहला आहे. तेथें पाण्याची गैरसोय म्हणून आपल्या मुली देण्यासहि लोक कचरतात. आमचे दुर्दिन लौकर जातील अशी आशा दिसत नाहीं. असलेल्या विहिरी उपसून पाण्याची सोय केली तर फार बरें होईल! उन्हाळ्यांत रस्त्यावरील फोपाट्यानें एखाद्याला मूर्च्छा आली तर त्याला डोळ्याला लावावयास पाणी मिळत नाहीं. मुलांची शाळा गांवापासून लांब असल्यामुळें त्यांचे पाण्यावांचून हाल होतात. लहान मुलांची तरी सरकारला कींव येवो!"

**ठराव पास झाला.**

---

## ठराव नववा.

### वॉर अलावन्स.

"पाटील कुलकर्णी यांस वॉर अलावन्स द्यावा अशी या सभेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. शंकर पंढरीनाथ कुणकर्णी म्हणाले— " पाटीलकुळकर्ण्यांपासून भरपूर काम करून घेण्यांत येतें, पण त्यांना वॉर अलावन्स मिळत नाहीं, व साध्या कारकुनाइतकेंहि वेतन मिळत नाहीं. सरकारनें वतनदार लोकांची हेळसांड करूं नये अशी विनंति आहे. देशमुखांकडे वेतन रक्कम येते पण ती वेळेवर मिळत नाहीं. पाटील-कुळकर्ण्यांना जादा पगार, देणग्या वगैरे मिळाल्या पाहिजेत. कुळकर्ण्याला पट्टेवाल्यापासून साहेबापर्यंत रामराम, सलाम करतांना हातावर आयोडिन घालण्याची पाळी येते! दयाळू इंग्रज सरकार आमच्या हालांकडे लक्ष देईल काय ? "

या ठरावास अनुमोदन देतांना तडवळ्याचे रा. नारायण कृष्ण देशपांडे ह्मणाले—" कुळकर्णी, पाटील वगैरे वतनदार लोकांना वॉर अलावन्स मिळत नाहीं. पण तलाठ्यांना मात्र मिळतो. सरकारचा वतनदार मंडळीवर रोष आहे. कुळकर्ण्यांचीं वतनें नष्ट करण्याची सरकारची प्रवृत्ति आहे.दुर्गादेवीचा दुष्काळ पडून सर्व प्रांत ओस पडला, त्यावेळीं देशमुख देशपांड्यांनीं,पाटील-कुळकर्ण्यांनीं वसाहती करून राज्यस्थापनेला मदत केली. पण आतां हिंदू विधवेला जसें अन्नवस्त्र देतात तसें आमचीं वतनें नष्ट करून सरकार एकतृतीयांश नेमणूक करून देतें. अशा तऱ्हेनें वतनदार लोकांची दैना उडाली आहे. ज्या आमच्या पूर्वजांनीं प्राण खर्ची घालून वतनें संपादन केलीं त्या आह्मांला वतनाचें महत्व कळलें पाहिजे. "

**ठराव पास झाला.**

---

## ठराव दहावा.

### बार्शी म्युनिसिपालिटी.

"बार्शी म्युनिसिपालिटींतील सभासदांची संख्या १८ ची २० करावी व ह्यांपैकीं दोन कौन्सिलर जनरल इलेक्शननें निवडून यावे व बार्शी येथें हायस्कूल स्थापन करावें अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. वैद्य वकील ह्मणाले. "बार्शी म्युनिसिपालिटीचे सभासद वीस करून त्यांपैकीं दोन जनरल् इलेक्शनमध्यें निवडून देण्याचा

अधिकार सरकारनें द्यावा. हल्लीं मेंबरांची निवड होते, पण ती लायकी पाहून होत नाहीं. मी कोणाहि व्यक्तीला दोष देत नाहीं. मेंबरानें कोणत्याहि प्रकारची स्वार्थी बुद्धि ठेवतां कामा नये. मेंबराला कांहीं तरी शिक्षणाची मर्यादा घालण्यांत आली पाहिजे, याशिवाय स्थानिक स्वराज्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं, आम्हीं आपापसांत अज्ञानानें भांडतों व मग सरकार दोघांनाहि मूर्ख ठरवितें. येथें एक सरकारी हायस्कूल होणें अवश्य आहे. सरकारला विनंति करून फारसा उपयोग नाहीं. लोकांनीं वर्गण्या वगैरे जमवून या बाबतींत जोराचा प्रयत्न केला पाहिजे.

या ठरावास रा. कान्हेरे वकील यांनीं अनुमोदन दिल्यावर ठराव पास झाला व अकरा वाजण्याचे सुमारास सकाळच्या बैठकीचें काम संपलें.

---

# दिवस दुसरा.

## दुपारची बैठक.

ता. १९ रोजीं दुपारीं ४॥ वाजतां परिषदेच्या कामास पुनः सुरवात झाली. सर्व सभा स्थिरस्थावर होतांच पद्यगायन झालें व नंतर रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं रौलेट बिलासंबंधींचा ठराव सभेपुढें मांडला.

### ११ ठराव

" हिंदी लोकमत सर्वस्वी विरुद्ध असतांना तांतडीनें तडकाफडकी गुप्त चौकशी करण्याचा कायदा सरकारनें पसार केला तर त्या कायद्यास प्रजेस मान्यता देतां येणार नाहीं असें या परिषदेचें मत आहे."

ठराव वाचून दाखवून रा. केळकर म्हणाले:—" हा ठराव स्थानिक गृहस्थांनीं पुढें मांडला असता तर बरें झालें असतें. या ठरावाच्या प्रत्येक शब्दांत विशेष अर्थ आहे. कायदा कदाचित् पासहि झाला असेल पण तें अजून आपणांस माहीत नसल्यामुळें ठरावाची भाषा सांकेतिक ठेवली आहे. या बिलाचें स्वरूप ब्रिटिश न्यायदेवतेच्या तोंडाला काजळ फासणारें आहे असें बिनदिक्कत म्हणतां येईल. ( टाळ्या ) ब्रिटिश राज्याचे मुख्य गुण म्हणजे न्याय देण्याची बुद्धि होय ! स्वदेशी सरकारापेक्षां न्यायाच्या बाबतींत ब्रिटिश सरकारला चार मार्क अधिक देण्याची वहिवाट आहे. आजपर्यंत ब्रिटिश देशांतून न्यायदेवतेचीं तत्वें शिकून जे लोक इकडे राज्य करण्यास आले त्यांनीं न्यायबुद्धीला धरूनच कायदे करण्याचें काम चालविलें होतें. पण ' सुस्थे को वा न पंडितः ' या न्यायानें जोंपर्यंत बिलकुल चळवळ न करतां अजागळ प्रकारानें प्रजा रहात होती तोंपर्यंतच त्यांची न्यायबुद्धि टिकली, पण गेल्या २५–३० वर्षांत शिक्षणाच्या प्रसारामुळें लोक असंतुष्ट झाले आहेत. लोकांनीं आपला असंतोष तोंडानें बोलून दाखविण्यासहि सुरुवात केली. दहा बोलले म्हणजे एक तरी कृति करतोच. सभा, व्याख्यानें, अर्ज, इत्यादि प्रकारांनीं राष्ट्रीय चारित्र्याला सुरुवात होतांच सरकारची न्यायबुद्धिहि ढळूं लागली. १८९७ सालीं लो. टिळकांवर खटला झाल्यापासून अन्यायाला सुरुवात झाली म्हटलें तरी चालेल ! या वेळेपासून सरकारनें राजद्रोहाच्या कायद्यांत जांवईशोध घालण्यास सुरवात केली आहे. आतां तर या कायद्यांत इतके शोध झाले आहेत कीं त्याचें मूळचें स्वरूपच उमगेनासें झालें आहे. आतां तर दुरुस्त्या, पुन्या पडेनाशा झाल्यामुळें तडकाफडकी न्याय करण्याचें व गुप्त चवकशी करण्याचें नवें

बिल सरकारनें पुढें आणलें आहे. पूर्वी वेळ लागला तरी न्याय मिळण्याची आशा वाटत असे; पण या नव्या बिलानें तीहि आशा नष्ट झाली आहे. दोरें लावून न्याय देणें हाच प्रत्यक्ष अन्याय होय ! पहिलें बिल सर्वस्वी अजून पास झालेलें नाहीं, पण दुसरें बिल मात्र या वेळेला पास झालेंच असेल. या कायद्यांत झटपट रंगारीप्रमाणें आतां झटपट चवकशी होणार ! ( हंशा ) या बिलांत जे ४० गुन्हे ठरविले आहेत त्यांपैकीं एखादाहि गुन्हा केला असें सरकारास वाटलें ह्मणजे बिन-वारंटानें पकडण्यापासून फांशीं जाण्यापर्यंतच्या सर्व गोष्टी त्यांत आल्या आहेत. ज्याची जशी पुण्याई तसें त्याला प्रायश्चित् मिळेल ! पूर्वी पोलिस ठाण्यावर वर्दी देण्याचा नियम रामोशीबेरड यांना लावीत असत, पण या कायद्यानें राष्ट्रीय चळवळींत पडणारे लोक त्यांच्याच पंक्तीला जाऊन बसणार आहेत. आम्ही जर रामोशीबेरड तर कायदे करणारेही रामोशीबेरडच होत असें मी ह्मणतों ! सरकारनें केवळ आपल्या बहुमताच्या जोरावर आह्मांस खिंडींत गांठून व रात्रीं अपरात्रीं कौन्सिलच्या बैठकी भरवून हा कायदा करण्याचा घाट घातला आहे. या बिलास जहाल, मवाळ, राजेरजवाडे, जमीनदारजहागिर-दार या सर्वांनीं एकमतानें विरोध केला आहे. जे अधिकारी केवळ बहुमताच्या जोरावर कायदा करतात ते आह्मांला खिंडींत गांठींत नाहींत काय ? सरकारचा पगार खाणारे एका बाजूला व पगार न खाणारे दुसऱ्या बाजूला असे हे दोन तट कौन्सिलांत पडले आहेत. कायदे कौन्सिलांत बसून मेजकें बोलून व वेजकें काम करून स्वास्थ्य बिघडूं न देणारे अधिकारी आज बत्या लावून लोकस्वातं-त्र्यावर दरवडा घालीत आहेत. हिंडणें, फिरणें, सहवास ठेवणें, सभा भरविणें हे प्रजेचे नैसर्गिक हक होत. पण त्यांनाही या कायद्यानें सरकार हरताळ फांशीत आहे. या कायद्याप्रमाणें वकीलाच्या मदतीशिवाय गुप्त चवकशी होणार आहे. आजपर्यंत एखाद्या खुनाच्या आरोपीला वकील देण्याचें सामर्थ्य नसेल तर सरकार आपला वकील त्यास देत असे ! पण नवीन कायद्यानें वकीलच देतां येत नाहीं. या कायद्यांत वकील नाहीं. पुरा-व्याचा ॲक्ट नाहीं, अपील नाहीं. जेथें चार लोक बसतात तेथें न्याय करतांना न्यायाधिशाला अन्नूला जागावें लागतें. पण या कायद्यानें तेंहि दडपण नष्ट झालें आहे. या कायद्याच्या कचाटींत सर्व सामान्य लोक येणार नाहींत हें खरें, तरी कोणालाहि चुकूनसुद्धां सार्वजनिक कामांत पडण्याची इच्छा झाली तरी त्याच्या बोकांडीं हा कायदा बसेल हें लक्ष्यांत ठेवा. असला कायदा झाला तर काय करायचें ? या प्रश्नाचें उत्तर या ठरावांत असें दिलें आहे कीं, प्रजेस हा कायदा मान्य करतां येणार नाहीं. पूर्वी कायदे वाईट असले तरी मानीत होतों पण आतां हा कायदा कोणीहि स्वाभिमानी गृहस्थ मानणार नाहीं. मी स्वतः कांहीं हा कायदा मानणार नाहीं मग काय होईल तें होवो. आजपर्यंत पुष्कळ निषेध प्रदर्शित झाले पण कायदा मोडीन अशा तऱ्हेचे शब्द

हे नवीनच आहेत. आतां राष्ट्रदेवता जागृत झाली आहे. ती इतकी प्रखर आहे कीं, कोणताहि जुलमाचा कायदा पचनीं पाडील. शंकरांनीं विष प्राशन केलें त्याप्रमाणें लोक हा कायदा पचवून टाकतील ? आतां मी तुह्मांस विचारतों, कीं, हा कायदा मानणार कीं मोडणार ? ( मोडणार ! मोडणार ! असा ध्वनि ) ''

या ठरावास अनुमोदन देतांना रा. तात्यासाहेब टिळक म्हणाले ''रा. केळकर यांनीं सुबोध पण सणसणीत भाषण करून कायद्याच्या हिडिस स्वरूपाचें विवरण केलेंच आहे. असले कायदे झाले तर ते मोडलेच पाहिजेत असें जें त्यांनीं मत दिलें तें मला सर्वस्वी मान्य आहे. इंग्रजी राज्याच्या बळकटीचा पाया म्हणजे त्याची न्याय देण्याची पद्धती होय. इंग्रजी राज्य झाल्यापासून भाषणस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्याची जी देणगी आपणांला मिळाली त्यामुळें आपला फार फायदा झाला आहे. तुम्ही हा कायदा पाळणार कीं मोडणार असें ज्या राज्यांत उघडपणें विचारतां येतें तें राज्य लोकांना कां प्रिय होणार नाहीं ? इंग्रज स्वतः भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य यांचे चहाते असल्यामुळें त्यांच्या अनुकरणानें आह्मांलाहि न्यायाची गोडी लागली आहे. पण हा रौलॅट कायदा जुलमी व अन्यायमूलक आहे. या कायद्यांतील गुप्तचौकशीचा भाग तर फारच भयंकर आहे. एखाद्या माणसासंबंधी नुसता अराजकतेचा संशय येतांच त्यास पकडावयाचें व त्यास सरकारी कमिशन सांगेल ती शिक्षा ठोठावावयाची हा न्याय कुठला ? या कायद्याचा मुख्यतः राजकीय काम करणाऱ्यावर विशेष कटाक्ष आहे व अशा माणसावरच आपलें विशेष प्रेम असल्यामुळें आम्ही या कायद्याचा जोरानें निषेध केला पाहिजे. लढाई चालू असतां आम्ही जो पराक्रम गाजविला त्यामुळें आम्ही राज्यकर्त्यांच्या बरोबरीचे ठरून आह्मांस आतां जबाबदार राज्यपद्धती मिळणार अशी गोड आशा करीत बसलों असतां लढाई संपली, व आतां सरकारनें हा कायदा पुढें आणला आहे. आमच्या लोकांनीं सरकारची पुष्कळ विनवणी केली, दाढीला हात लावला, कोटिक्रम लढविले, उपसूचना आणल्या, पण कांहीं एक उपयोग झाला नाहीं. असला कायदा पास करणें हें संभावितपणाला न शोभण्यासारखें असून एक प्रकारें राजनिष्ठेबद्दल बक्षीस म्हणून बडगा उगारण्यासारखें आहे. असला कायदा हा मोडलाच पाहिजे. ( टाळ्या )''

या ठरावास पुष्टि देतांना रा. गणपतराव कौलगीकर म्हणाले '' रौलॅट कायदा हा कायदा नसून निव्वळ दडपशाही आहे ! जो कायदा लोककल्याणासाठीं असतो व ज्याला लोकप्रतिनिधींची संमति मिळते तोच खरा कायदा होय. सार्वजनिक कार्य करणाऱ्या लोकांच्या गळ्याला फांस लावणारा जो कायदा तो पाळणार कीं मोडणार असला प्रश्नच विचारण्याची मुळीं जरूरी नाहीं ! असला कायदा पास होतो ही गोष्ट फार चांगली आहे. आजपर्यंतच्या आपआपसांतील सर्व भांडणावर वरवंटा फिरविणारा हा कायदा आहे. असल्या कायद्याची अम्मल

बजावणी अशक्य केली पाहिजे. आपल्या पोटावर पाय आले तरी चालतील पण असल्या कायद्यास कोणीहि मदत करतां कामा नये."

रा. सितारामपंत लळीत म्हणाले "या बिलानें जी शिक्षा होणार ती संशयानें होणार, पुराव्यानें नव्हे! आपण सर्व लोक कायद्याला मान देणारे आहों पण हें बिल इतकें भयंकर आहे कीं, त्यास कायदा न म्हणणेंच जास्त शोभेल. या कायद्याविरुद्ध म. गांधींनीं सत्याग्रहाची मोहीम सुरू केली आहे. एकोणिसशें सात आठ सालीं कोणीहि रस्त्यावर वन्देमातरम् म्हणूं नये असा अन्यायाचा सरकारी हुकूम निघतांच सुरेंद्रबाबूसारख्यांनीं प्रत्येक उंबरठ्यांत जाऊन व वन्देमातरम् ओरडून त्या हुकुमाची थट्टा केली. त्यानंतर ज्यावेळीं बिझान्टबाईंना सरकारनें पकडलें त्यावेळीं सरकार स्वराज्यसंघास बेकायदेशीर ठरवील तर आम्ही तो हुकूम मानणार नाहीं असें हजारपंधराशें लोकांनीं सह्या देऊन प्रसिद्ध केलें. सुदैवानें त्यावेळीं यश आलें. त्याच मार्गाचा आजहि आपणांस अवलंब करून या कायद्याचा प्रतिकार केला पाहिजे."

**ठराव पास झाला.**

---

## ठराव बारावा.

### स्वराज्य.

"स्वराज्ययोजनेबद्दल लवकरच विलायतेस बिल येणार आहे. या बिलांत मॉंटेग्यू—चेल्मसफर्ड रिपोर्टावर जें हिंदीमत प्रदर्शित झालें आहे त्या दृष्टीनें जनतेची आकांक्षातृप्त होईल अशा तऱ्हेची योजना तयार व्हावी असें या परिषदेचें मत आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. रामभाऊ साने म्हणाले "या विषयास १९१७ सालापासून विशेष चालन मिळालें आहे. आज मॉंटेग्यू साहेबांच्या सुधारणांना मूर्त स्वरूप येण्याची वेळ आली आहे. पण त्यांनीं देऊं केलें आहे तेवढें पुरवयाचें नाहीं असें सर्वांचें म्हणणें आहे. दिल्लीचें सरकार ज्या ठिकाणीं आहे तेथें आम्हांस आणखी सत्ता मिळाली पाहिजे. या बाबातींत मॉंटेग्यू साहेबांची स्थिति कींव येण्यासारखी झाली आहे. आम्ही म्हणतों आणखी द्या, आणि सिडेनहॅम म्हणतात, इतकें देऊन राज्याला आग लावतां कीं काय! कांहीं असलें तरी हिंदुस्थानसरकारच्या राज्यकारभारांत आह्मांस हिस्सा मिळाल्याशिवाय आमचें समाधान होणें शक्य नाहीं. आमच्यामध्यें मतदारसंघ नाहींत असा एक आक्षेप घेण्यांत येतो पण त्याचा दोष लोकांकडे येत नसून सरकारकडेच येतो. उजेड होवो असें परमेश्वरानें म्हटल्याबरोबर ज्याप्रमाणें उजेड झाला त्याप्रमाणेंच

मतदार होवेत असें सरकार म्हणेल तर आमच्यामध्यें मतदारसंघहि होतील! हल्लीं आपण तीन लाख मतदार या इलाख्यांत आहोंत ते, सरकार करील तर दहा बारा लाख सहज होतील. स्वराज्याचे हक्क विशिष्ट जातींकरितां आहेत ही चुकींची कल्पनाच मनांतून काढून टाका. आम्हांला हक्क मिळाले तर त्यांत राजेरजवाड्यांनाहि आनंदच होणार आहे, असें बिकानेरच्या महाराजांनीं स्पष्ट सांगितलें आहे. लॉर्ड सिंह यांनीं असा इषारा दिला आहे कीं, ' संशयानें राज्यकारभार करूं नका ' ज्यांनीं युरोपियन रणभूमीवर देशाकरितां रक्त सांडलें त्यांनाही लोकांस अधिकार मिळाल्यानें आनंदच होणार आहे. लष्करी लोकांना खुष करावयाचें असेल तर त्याना कमिशनच्या जागा द्या. त्यांत आम्हांला आनंदच आहे. मॅंटेग्यूसाहेबांस आमचें सांगणें इतकेंच कीं, आमच्या ह्मणण्याप्रमाणे सुधारणा द्याल तरच आम्ही संतुष्ट राहूं.

या ठरावास अनुमोदन देतांना रा. आराध्ये म्हणाले, " मीं मागच्या परिषदेच्या वेळीं आशेचें भाषण केलें होतें. पण गेल्या सतरा महिन्यांत पुष्कळच निराशेची वेळ आली आहे. मॉंटेग्यू साहेब देत आहेत तेवढ्यानें आमची तृप्ति होणें शक्य नाहीं. प्रे. वुइल्सन् यांच्या ह्मणण्याप्रमाणें आमच्या देशालाहि स्वयंनिर्णयाचें तत्त्व लावण्यांत आलें पाहिजे. हिंदुस्थान व इंग्लंड यांचा जो संबंध परमेश्वरानें घडवून आणला आहे तो टिकण्याकरितां आम्हांस स्वराज्य मिळणें अवश्य आहे. आमच्या आकांक्षा जर पूर्ण झाल्या नाहींत तर आह्मांस मिळालेलीं अभिवचनें प्रामाणिकपणाचीं नव्हतीं असें आम्ही म्हणूं! आम्ही आपली पात्रता महायुद्धांत सिद्ध केलीच आहे. "

**ठराव पास झाला.**

---

## ठराव तेरावा.

### बार्शी लाइट रेलवे.

"सरकारनें, बार्शी लाइट रेलवे व जी. आय. पी. रेलवे यांच्या डब्यांतून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे जे हाल होतात तिकडे लक्ष देण्याविषयीं रेलवे कंपन्यांस सांगावें व बार्शी लाइट रेलवेनें कुर्डुवाडी येथें जी. आय. पी. प्लॅट फॉर्म समोर प्लॅट फॉर्म करावा, उतारू लोकांस दोन्ही रेलवेनें वागणींतून नेऊं नये, तिसऱ्या क्लासचे डबे अधिक जोडावे व बार्शी लाइट रेलवेनें कुर्डुवाडीस वेटिंगरूम करावी असें या परिषदेचें मत आहे."

हा ठराव पुढें मांडतांना पंढरपुरचे रा. फणसळकर म्हणाले " बार्शी लाइट रेलवेच्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे जे हाल होतात ते केवळ अंगावर शहारे आ-

णणारे आहेत. या रेलवेनें दुपारीं उन्हांतून प्रवास केला तर सर्दी तेव्हांच नाहींशी होते ! ही रेलवे म्हणजे लठ्ठ पगार खाऊन जांवई झालेल्या इंग्रज लोकांची जांवई रेलवे आहे. ज्या डब्यांत ६७ माणसें बसण्याची तजवीज केलेली असते तेथें १७४ पर्यंत माणसें कोंबल्याचें मला माहीत आहे. आजपर्यंत नाटकांना तिकिटें लावीत असत पण बार्शी लाइट रलवेनें आपल्या पुलाला तिकीट ठेवलें आहे! मालाच्या डब्यांतून माणसांना नेणाऱ्या रेलवेला वाटतें कीं, हिंदुस्थानांतील माणसें हीं मालाच्या पोत्यासारखींच आहेत. डबे वाढवा म्हटलें तर दोन दिवसाच्या यात्रेकरितां डबे वाढवितां येत नाहींत असें रेलवेकडून उत्तर मिळतें. सरकारची शाळांवर जितकी हुकमत चालते तितकीहि या रेलवेवर चालत नाहीं. डब्यांतून मुताऱ्या नाहींत, स्टेशनावर बसण्याची सोय नाहीं, अशीही रेलवे आहे. ही रेलवे लोकांपासून पोतीं भरून पैसे नेते पण लोकांची सोय मात्र पहात नाहीं. पुलाला पांच लाख रुपये खर्च आला पण त्याबद्दल रेलवेच्या खिशांत आतांपर्यंत किती पैसे पडले याचा हिशेब करून आतां तरी सरकारनें पुलावरील पट्टी बंद करावी. सर्व हिंदुस्थानांत कोठेंही पूलपट्टी बसाविली जात नाहीं. मग सरकारनें याच कंपनीस तेवढा पूलपट्टीचा हक्क कां दिला ? रेलवेनें उतारूंची सर्व सोय करून देणें हें तिचें कामच होय. कुर्डुवाडी स्टेशनवर उतारूंची रहाण्याची चांगली व्यवस्था केली पाहिजे. ”

---

या ठरावास अनुमोदन देतांना रा. सूरनीस म्हणाले “ बा. ला. रेलवेची व्यवस्था पाहिली म्हणजे असें वाटतें कीं, तिनें जणूं काय यात्रेकरूंच्या शक्य तितक्या गैरसोयीच करूं असा करारनामा सरकारांशीं करून दिला आहे ! या रेलवेपासून इन्कमटॅक्स घेण्याचें सुद्धां बरेच दिवस नजर चुकीनें राहिलें होतें ! सेकंड क्लासच्या उतारूंपासून पुलाची पट्टी जास्त घेतात याचा अर्थ मनुष्य सेकंड क्लासांत बसला म्हणजे त्याचें वजन वाढतें असा आहे कीं काय ? या रेलवेवर पाण्याचीहि सोय नाहीं. एक बाई मुलाला घेऊन मागें लातूरकडून आली होती. कुर्डुवाडी स्टेशनवर सांवलीची सोय कांहींच नसल्यामुळें ती इकडून तिकडे जात असतां वैशाखांतील उन्हानें तळमळून चक्कर येऊन पडली. सरकार लोकांच्या हालाकडे लक्ष देईल काय ? ”

या ठरावास पुष्टि देतांना रा. रायमल शेटजी म्हणाले “ माऊंटफर्ड साहेबांच्या दरबारांत आम्हीं रेलवेविरुद्ध तकारी केल्या तेव्हां रेलवेनें सोयी करून देऊं असें आश्वासन दिलें. पण अजून त्यांचा पत्ता नाहीं. उलट आमचीं दुःखें वाढतच आहेच. रेलवेचें उत्पन्न पांच कोटींचें साडे सात कोटीं झालें पण आमच्या सोयी मात्र वाढत नाहींत. आपण भांडल्याशिवाय गैरसोयी दूर व्हावयाच्या नाहींत. ”

**ठराव पास झाला.**

---

# ठराव चवदावा.

## सिद्धेश्वर तलाव.

" सोलापूर येथील श्रीसिद्धेश्वराचा तलाव हें पवित्रस्थान असल्यामुळें लोकांच्या धार्मिक समजुतीस धक्का बसेल असें कृत्य सोलापूर म्युनिसिपालिटीनें किंवा सरकारनें करूं नये असें या परिषदेचें मत आहे. "

हा ठराव पुढें मांडतांना रा. शंकरराव म्हमाणे म्हणाले " सोलापूर येथें सिद्धेश्वराच्या यात्रेस अठरा पगड जात जमते. सर्व लोक या तलावास तीर्थ समजतात. कित्येक लोक तर हें तीर्थ घेतल्याशिवाय अन्न घेत नाहींत. या तलावानें हवेची घाण होते म्हणून तलाव नाहींसा करण्याबद्दल प्रकरण चालूं आहे. पण तलाव राखून पाणी शुद्ध करावें अशी आमची सरकारास विनंति आहे. "

या ठरावास रा. पंचाप्पा हत्ती यांनीं अनुमोदन दिल्यावर ठराव पास झाला.

---

# ठराव पंधरावा.

---

## शाळामास्तरांचा पगार.

"पहिल्या वर्षाच्या ट्रेंड मास्तरांचा पगार २० रु. पासून ते ३५ रुपयांपर्यंत दरसाल आठ आणे या प्रमाणानें वाढवावा, दुसऱ्या वर्षाच्या मास्तरांचा पगार २५ रु. पासून ५५ रुपयांपर्यंत दरसाल रुपया याप्रमाणें वाढवावा. तिसऱ्या वर्षाच्या मास्तरांचा पगार ३० रु. पासून ७५ रुपयेपर्यंत दरसाल १८८ रुपयांप्रमाणें वाढवावा. ५०, ७. अथवा १०० अशा दोन जागा योग्य मास्तरांस उत्तेजन देण्याकरितां जिल्ह्यांत राखून ठेवाव्या, इंग्रजी पहिल्या तीन यत्ता पूर्ण प्राथमिक शाळांतून अधिक ठिकाणीं सुरू कराव्या अशी या परिषदेची सरकारास विनंति आहे."

हा ठराव पुढें मांडतांना रा. वैद्य म्हणाले, "शिक्षणाचें काम फार पवित्र आहे. शाळामास्तरांच्या शिक्षणामुळेंच अंमलदार निर्माण होतात व विद्वान ग्रंथकार निपजतात. रेव्हिन्यू, पोष्ट वगैरे खात्यांपेक्षां मास्तरांचे पगार कमी आहेत, ही गोष्ट चांगली नाहीं. ' आचार्य देवो भव ' अशी मनूची आज्ञा आहे. आचार्यांचें पोट उपाशीं रहाण्यापासून लोकांचें नुकसानच आहे ! मराठी शाळेंत इंग्रजी तीन यत्ता शिकविण्याची कांहीं शाळांतून तजवीज करण्यांत आली आहे; पण अशा शाळांची संख्या वाढविण्यांत आली पाहिजे. "

या ठरावास रा. कान्हेरे वकील यांनीं अनुमोदन दिल्यावर तो पास झाला.

---

# ठराव सोळावा

—:०:—

## कंठाळी ठराव.

" या परिषदेची सरकारास अशी विनंति आहे कीं :—

१. जिल्ह्याच्या कारभारांत लोकप्रतिनिधींचा सल्ला घेण्याकरितां जिल्हा कौन्सिलें स्थापावीं.

२. सोलापूर जिल्ह्यास ज्यूरीचा हक्क द्यावा.

३. मॅजिस्ट्रेटचीं कोर्टें स्टेशनरी ( कायमचीं ) करावीं.

४. व्यापाराच्या नियंत्रणानें रयतेस त्रास होतो सबब नियंत्रण दूर करावें.

५. जिल्ह्याचा अहवाल देशभाषेंत प्रसिद्ध व्हावा.

६. शेतकीची एक व कलाकौशल्याची एक अशा दोन शाळा सोलापूर जिल्ह्यांत स्थापाव्या.

७. अबकारी कमिट्या स्थापून त्यांचा अभिप्राय बंधनकारक असावा.

८. सोलापूर जिल्ह्यांत शेतकीच्या उपयोगाकरितां विहिरी व तळीं अधिक करावीं.

९. हत्यारांचे परवाने सढळपणानें शेतकऱ्यांस द्यावे.

हे ठराव पुढें मांडतांना रा. सामंत वकील म्हणाले " तिसऱ्या ठरावांत मॅजिस्ट्रेट कोर्टें स्टेशनरी करावींत अशी जी सूचना करण्यांत आली आहे ती महत्त्वाची आहे. पत्रावळीमागून जसे द्रोण, तसें मॅजिस्ट्रेटामागून हल्लीं लोकांना जावें लागतें. मॅजिस्ट्रेटाकरितां लोक नाहींत तर लोकांकरितां मॅजिस्ट्रेट आहेत, ही जाणीव अजून आपल्याकडे उत्पन्न झालेली दिसत नाहीं. एका विवक्षित ठिकाणीं मॅजिस्ट्रेटचें कोर्ट असणें अवश्य आहे. जिल्ह्याचा अहवाल देशी भाषेंत प्रसिद्ध करण्यांत यावा हाहि ठराव महत्त्वाचा आहे. हल्लीं सुद्धां जिल्ह्याचा अहवाल इंग्रजींतहि प्रसिद्ध होत नाहीं. या ठरावांत दोन वर मागितले आहेत ! मलगा पाहिजे असेल तर नातू व्हावा असा वर मागण्यापैकींच हा ठराव आहे. शेतकी व कलकौशल्याच्या शाळा काढण्यांत याव्या या ठरावाचें महत्व शेतकीवर जगणाऱ्या आपल्या देशाला किती आहे तें विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. तळीं, विहिरी यांचीहि आपल्याकडे फार वाण आहे. या उणीवीकडे सरकारनें लक्ष देणें जरूर आहे. हत्यारांचे परवाने जरूर तितके देण्याची पद्धति सर्व देशांतून आहे, पण या बाबतींत हिंदुस्थानची बात और आहे. आमच्याकडील परवाने दरवर्षी वाढण्याऐवजीं कमींच होत आहेत ! अमुक एक मनुष्य होमरूलर आहे म्हणून त्याचा परवाना काढून घ्या हें कारण तर फारच विचित्र होय ! कलेक्टर

साहेबांना होमरूलर होणें आवडत नसेल तर त्यांनीं आपली आवड घरीं ठेवावी. असला कार्यकारणभाव लावल्यानें ब्रिटिश राज्याविषयींचा आदर मात्र कमी होतो. मद्यपानाला आळा घालण्यासाठीं अबकारी कमिट्या नेमणें जरूर आहे. एका माणसावर कारभार सोंपविणें इष्ट नाहीं. त्याला लोकांचीच भल्ला पाहिजे."

या ठरावास अनुमोदन देतांना वैरागचे रा. पिंपळनेरकर म्हणाले "हा विषय फार गहन आहे. रा. सामंत यांनीं या विषयाचें विवेचन केलेंच आहे. मी शेतकरी आहें, म्हणजे गरीब आहें. शेतकी आणि गरीबी हीं एकच आहेत म्हणावयास हरकत नाहीं. शेतकरी वर्गाची अत्यंत निकृष्ट स्थिति झाली आहे. यंदां तर शेकडा ७५ शेतकऱ्यांना घरीं धान्य आणण्याचेंच कारण पडलें नाहीं, तरी आणेवारी आठदहा आणे झालीच! सरकारनें दुष्काळी लोकांकरितां तळीं, विहिरींचीं कामें काढावींत."

## ठराव पास झाला.

---

हे सर्व ठराव योग्य ठिकाणीं पाठविण्याचा अधिकार सेक्रेटरीस देण्यांत आल्यावर माढ्याचे रा. कुलकर्णी यांनीं परिषदेस पुढील वर्षीचें आमंत्रण दिलें व त्यास रा. रायमल्ल शेटजी यांनीं अनुमोदन दिलें.

## आभारप्रदर्शन.

आभार मानतांना रा. आराध्ये म्हणाले " आतांपर्यंतचें काम अध्यक्ष महाराज, आपल्या आज्ञेनें चाललें होतें, पण आतां सभेचें मुख्य काम संपल्यामुळें मी आपल्या आज्ञेशिवाय बोलावयास उभा राहिलों आहें. आतांपर्यंत आजच्या या जबाबदारीच्या प्रसंगीं परिषदेचें काम आपण इतक्या उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें याबद्दल मी सर्वांतर्फे आपले आभार मानितों. बार्शीकरांनींहि या परिषदेची जबाबदारी अंगावर घेऊन ती पार पाडल्याबद्दल मी त्यांचेहि आभार मानितों. डॉ. दातीर यांच्या पुढारीपणाखालील ज्या स्वयंसेवक मंडळीनें परिश्रमपूर्वक काम केलें आहे त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. बार्शीकरांनीं स्त्रियांकरितां बसण्याची व्यवस्था केली ही फार चांगली गोष्ट झाली आहे. एका अंगानें प्रगति होण्याऐवजीं या कार्यांत आमच्या कुलस्त्रिया भाग घेतील तरच त्याला पूर्णता येणार आहे."

रा. सापटणेकर म्हणाले "प्रो. परांजपे यांनीं आपला महत्त्वाचा वेळ खर्च करून जी परिषदेची उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे त्याबद्दल त्यांचे आभार न मानणें कृतघ्नपणाचें होईल. त्यांच्या उपदेशाप्रमाणें थोडें जरी वागूं तरी त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त झाल्याचें श्रेय मिळेल."

रा. फणसळकर म्हणाले "स्वागतमंडळ व त्याचे अध्यक्ष रा. भाऊसाहेब साने, रा. तात्यासाहेब केळकर व पुण्याचे सन्माननीय पाहुणे यांचे मी आभार मानितों."

रा. सामंत म्हणाले,"मी या आभारप्रदर्शनाच्या ठरावास सोलापूर तालुक्यातर्फे अनुमोदन देतों. डॉ. दातीर हे सोल्जर असून गवई आहेत. त्यांच्या हाताखालीं काम करणाऱ्या स्वयंसेवकमंडळीमध्यें सर्व जातीचे, सर्व दर्जाचे तरुण लोक केवळ राष्ट्रकार्यासाठीं एक झालेले आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय. सेक्रेटरी हे अव्यक्तब्रह्माप्रमाणें पाठीमागें असले तरी त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे, सभेचें काम संपलें तरी ठरावांची विल्हेवाट लावण्याचें त्यांचें काम शिल्लक आहे. रा. अण्णासाहेब सुलाखे यांच्या कृपेमुळें आम्हांला येथें घरच्यासारखें वाटलें. मी डिस्ट्रिक्टकाँग्रेस कमिटीतर्फे सर्वांचे आभार मानितों."

रा. अण्णासाहेब सुलाखे म्हणाले "आपण आमची सेवा गोड करून घेतल्याबद्दल आपले आभार मानणें जरूर आहे. आमच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर केल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानितों. हा जय व्यक्तीचा नसून राष्ट्रकार्याबद्दल खेडोखेडींसुद्धां जो उत्साह उसळून राहिला आहे त्याचें हें फळ होय. रा. बाबासाहेब सारवरे वारले याबद्दल दुःख प्रदर्शित केल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं. ज्या लोकमतानें आम्हांस धैर्य दिले त्याचा मी उतराई आहें."

रा. रामभाऊ साने म्हणाले "येथील सेक्रेटरी व व्हॉलंटियर यांनीं जे श्रम केले आहेत ते अपार होत, सुलाखे घराण्यानें तर घरच्या लग्नाप्रमाणें श्रम केले आहेत. सर्व शहरांतील मंडळींनीं आम्हांस सर्व प्रकारची मदत केली आहे. ज्या गालिच्या, सतरंज्यांवर आपण बसलां आहां तें सामान कोणाचें आहे हें जर सांगितलें तर आमच्या येथें मतभेद नाहीं असें आपल्या दृष्टीस येईल. ( टाळ्या ) अध्यक्षांनीं उत्तम रीतीनें कर्णधारपणा चालविल्याबद्दल मी त्यांचे आभार मानून त्यांस हा पुष्पहार अर्पण करतों. ( पुष्पहार घालतात ) कुर्डुवाडी व इतर तालुक्यांतील लोकांनीं आम्हांस फार मदत केली आहे. पोमलवाडीकरांनीं अध्यक्षांचें प्रथम स्वागत केलें. कुर्डुवाडीच्या रायमल शेटजींनीं पाहुण्यांची उत्तम व्यवस्था ठेविली. रेलवेनेंहि आम्हांस मदत केली आहे. पोलिसांच्या सौजन्याचें तर वर्णन करावें तितकें थोडें आहे. पोलिस सब-इनस्पेक्टर मि. आगाशे यांचें सौजन्य वाखणण्यासारखें आहे. मी सर्व डेलिगेटांचे आभार मानतों."

## अध्यक्षांचा समारोप.

समारोप करतांना अध्यक्ष म्हणाले "सभ्य गृहस्थहो, आपण केलेल्या स्तुतीचा मार सहन करणें शिष्टसांप्रदायाला अनुसरून असलें तरी मला तो सहन करणें कठीण झालें आहे. आपल्या स्तुतीच्या मारांतून व्हॉलंटियर, स्वागतमंडळी वगैरे सर्व निसटून गेली आहेत व मीच शेवटचा वाटसरू शिल्लक राहिलों आहें. मी आतां आपल्या उपकृतीचा पहिला भार कमी करतों. (गळ्यांतील हार काढून खालीं ठेवतात. ) आतांपर्यंत औपचारिक भाषा पुष्कळ झाली, पण औपचारिक भाषा गेली व मी अध्यक्ष व आपण सभाजन ही माया विगलित झाली म्हणजे

आपण सर्व अभिन्न आहों हेंच सत्य शिल्लक रहातें. आपण सर्व एकाच मायभूमीचीं लेकरें आहों. आपली जन्मभूमी निकृष्ट अवस्थेला पोंचली असून कष्टांनीं वांकली आहे, दुष्काळानें ग्रस्त झाली आहे, व दुःखानें त्रस्त झाली आहे. आपण सर्व भेदभाव विसरून देशसेवा करण्याकरितां जमलों आहों. हरतऱ्हेनें गांजलेल्या या देशांत जन्मास येऊन त्याची सेवा करण्याची संधि आपणांस मिळाल्याबद्दल आनंदच मानला पाहिजे. लोकांचा उत्साह वृद्धिंगत होत आहे हें सुचिन्ह होय. पंढरपुरास चारशें प्रतिनिधी होते तर आज येथें प्रतिनिधींची संख्या चारशेंवर गेली आहे. हा उत्साह असाच वृद्धिंगत होत जावा अशी मी परमेश्वराची प्रार्थना करितों. ना. खापर्डे यांस आपण निमंत्रण केलें होतें पण ते आज दिल्लीस आपलेंच काम करीत आहेत. ना. खापर्डे, पटेल, व मालवीय हे सरकारच्या तटावर हल्ले चढवून आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांबद्दल आम्हीं सहानुभूति प्रगट केली पाहिजे. तें संख्येनें वीस पंचवीस असले तरी ते वीस पंचवीस कोट लोकच आहेत असें मी समजतों. त्यांना जय न आला तर तो आपल्या सहानुभूतीचा कमकुवतपणा समजला पाहिजे. आम्ही आज नाहीं उद्यां जय मिळविल्याशिवाय रहाणार नाहीं ही खात्री ठेवा. आपण आजपर्यंत दुसऱ्यांच्या नादीं लागून आपल्या देशाची पुष्कळ माती केली आहे. आपण आतां सावध होऊन, भेदभाव विसरून व परमेश्वरावर भरंवसा ठेवून काम केलें तर यश खात्रीनें दूर नाहीं. शेवटीं पुन्हां एकदां सर्वांचे आभार मानून आपली रजा घेतों. " ( टाळ्यांचा गजर )

अध्यक्षांचा समारोप झाल्यावर हार, तुरे, अत्तर, गुलाब होऊन 'वन्दे मातरम्' गीत म्हणण्यांत आलें व जयजयकारांत परिषदेचें काम खलास झालें.

## वंदे मातरं गीत.

राग-बंगीय ( काफी ) ताल-दीपचंदी.

**वंदे मातरम् ॥ सुजलाम्**
**सुफलाम् मलयज-शीतलाम्**
**शस्य-श्यामलां मातरम् ॥ धृ ॥**
**शुभ्र-ज्योत्स्ना-पुलकित-यामिनीम्**
**फुल्ल कुसुमित-द्रुमदल-शोभिनीम्**
**सुहासिनीम्, सुमधुर-भाषिणीम्**
**सुखदाम्, वरदाम्, मातरम्,**
**वंदे मातरम् ॥**

परिषद्चे ठराव नेक नामदार गव्हर्नर साहेब मुंबई यांजकडे सेक्रेटरींनीं पाठविले व ते पोहोंचल्याबद्दल आलेलें उत्तर याखालीं दिलेलें आहे:—

119 of 1919.

Government House,
Bombay,
25th April 1919.

Dear Sir,

I am to acknowledge receipt of your letter dated the 20th Instant submitting certain resolutions passed at the second Sholapur District Conference for the consideration of Government.

परिषदेकरितां जमलेली वर्गणी व तिकिटांचें जमलेलें उत्पन्न व झालेला खर्च याबद्दल हिशेब तयार आहे. कांहीं रक्कम अद्याप वसूल होणें आहे व कांहीं किरकोळ खर्चाचीं बिलें देणें आहेत. सर्व खर्च भागून जी शिल्लक राहील तिचा विनियोग कसा करावयाचा याचा विचार मागाहून करण्यांत येईल. शिलकीपैकीं बरीच मोठी रक्कम बार्शी युनिअनमध्यें व्याजीं ठेविली आहे. शिल्लक रकमेसंबंधानें कोणास कांहीं सूचना करणें असल्यास त्यांनीं त्या मेहेरबानीनें कराव्या. व जमाखर्च ज्यांस पहाणें असेल त्यांनीं ते पहावे अशी विनंति आहे.

# परिशिष्ट अ.

**स्वागतमंडळ.**

रा. रा. मो. साने (अध्यक्ष स्वागतमंडळ)

**खजिनदार.**

रा. गो. पं. सुलाखे

**जनरल सेक्रेटरीज.**

रा. गो. पं. सुलाखे
,, ग. रा. साने
,, द. वि. सुलाखे
,, ना. दा. कान्हेरे
,, शि. आ. साखरे

**ऑफिस कमेटी.**

रा. रा. मो. साने ( चेअरमन )
,, द. वि. सुलाखे ( सेक्रेटरी )
,, वा. दा. कान्हेरे

**विषयनियामक कमेटी.**

रा. गो. रु. टिळक ( चेअरमन )
,, रा. मो. साने
,, भ. पं. सुलाखे ( सेक्रेटरी )
,, भ. बा. वैद्य

**मंडप कमेटी.**

रा. ज. भू. वैष्णव ( चेअरमन )
,, भ. बा. वैद्य ( सेक्रेटरी )
,, गो. पं. सुलाखे
,, भ. पं. सुलाखे
,, दि. बा. डुबे
,, परशरामरामलाला परदेशी
,, रामलिंग आपा झाडमुखे
,, वि. चिं. पटवर्धन
,, आ. बा. देशमूख

**कँप कमेटी.**

रा. भि. य. मुगुटकर ( चेअरमन )
,, भ. बा. वैद्य
,, ह. भ. उटगीकर
रा. वि. भ. शेटे
,, गोकुळदास नेनसी
,, ल. का. घोडके
,, म. शं. हाडगे ( सेक्रेटरी )

**स्टोअर कमेटी.**

रा. वि. चिं. पटवर्धन
,, श. भा. कुळकर्णी
, म. रा. झाडमुखे
,, रा. तु कासार
,, दाजीबा मानेगांवकर

**स्वंयसेवक कमेटी.**

रा. वि. दा. दातार ( चेअरमन )
,, शं. गो. सहस्त्रबुद्धे
,, म. रा. झाडमुखे
,, सो. ना. वायकर
,, म. शं. हाटगे
,, ह. भ. उटगीकर (सेक्रेटरी)
,, भि. य. मुगुटकर
,, शि. आ. साखरे

**फंड कमेटी**

रा. शि. आ. साखरे ( चेअरमम )
,, भ. बा. वैद्य } सेक्रेटरीज.
,, दि. बा. डुबे }
,, कि. प. परदेशी }
,, गो. पं. सुलाखे
,, ग. रा. साने
,, गो. पं. सुलाखे
,, शं. दा. देशमुख
,, रा गं. गांधी
,, गोकुळदास नेनसी
,, घेलाभाई भाटे
,, ए. दि. पात्रुडकर
,, य. ह. देसाई

रा. वा. वी. चिलवंत
,, ना. सं. कथले
,, सिताराम रामप्रताप
,, म. वि. घोडके

**भोजन कमेटी.**

रा. गो. पं. सुलाखे ( चेअरमन )
,, शं. रं. शेटे } सेक्रेटरीज.
,, शं. दा. देशमुख }
,, ए. द. धर्माधिकारी
,, रा. ग. परांजपे
,, भ. वा. खिस्ती
,, भ. बा. पाठक
,, भ. मा. उचाळे

रा. गोकुळदास नेनसी
,, शि. आ. साखरे
,, सदाशिव आपा देवणे
,, ल. का. घोडके
,, म. शं. हाडगे
,, सिताराम रामप्रताप
,, र. शि. कर्वा
,, कि. प. परदेशी
,, घेलाभाई भाटे
,, र. ए. परंडकर
,, भ. पं. सुलाखे
,, द. मा. लोहकरे
,, स. आ. माढेकर

# परिशिष्ट ब.

## हिशोबाचा तक्ता.

| खात्याचें नांव. | जमा. | | | खात्याचें नांव. | खर्च. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | | रु. | आ. | पै. |
| वर्गणी | २३३९ | ८ | ० | ऑफिस खर्च | ९२ | ६ | ० |
| तिकीट विक्री | १४४१ | ० | ० | मंडप खर्च | १२०३ | ८ | ९ |
| भोजन तिकीट विक्री | २८८ | ० | ० | भोज़न खर्च | १३२४ | ११ | ३ |
| भोजन सामान विक्री | १९१ | ६ | ० | स्वयंसेवकांचे पोषाख | १५७ | ० | ० |
| फुलपान विक्री | ३६ | ८ | ० | प्रतिनिधींचीं फुलें वगैरे | ३१८ | ३ | ३ |
| कंदील विक्री | ५ | ४ | ० | रिपोर्ट छपाई वगैरे | १५१ | १४ | ० |
| स्वयंसेवक पोषाक विक्री ( वसूल येणें ) | ४० | ११ | ० | तांगा भाडें | ३४ | ४ | ० |
| | | | | कांच सामान | ३६ | १० | ० |
| किरकोळ | ७४ | १५ | ० | परिषदेचे फोटो | ३० | ० | ० |
| | | | | कमानी | १३ | ४ | ० |
| | ४४१७ | ४ | ० | दिवाबत्ती | १७ | ११ | ३ |
| | | | | फंड गोळा करण्याचा खर्च. | २१ | ५ | ६ |
| | | | | अनामत खातें | २४ | ० | ८ |
| | | | | एकूण. | ३५२४ | १४ | ० |
| | | | | शिल्लक. | ८९२ | ६ | ० |
| | | | | | ४४१७ | ४ | ० |